


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक १७८ * नांदेड * सोमवार, दि. ६ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# राज्याच्या काही भागात पावसाचा 'रेड अलर्ट'

## रायगड, पुण्यासह अनेक जिल्ह्यात शाळा-महाविद्यालयांना सोमवारी सुट्टी जाहीर!




**मुंबई (प्रतिनिधी)**– महाराष्ट्रात मान्सूनचा जोर प्रचंड वाढला असून अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने हाहाकार माजवला आहे. हवामान खात्याने दिलेल्या इशाऱ्यानुसार सोमवारी राज्यातील अनेक भागांत अत्यंत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. या हवामानाच्या पार्श्वभूमीवर पालघर आणि रायगड जिल्हा प्रशासनाने मोठा निर्णय घेतला आहे. या दोन्ही जिल्ह्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांना सोमवारी (६ जुलै) अधिकृत सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. सोमवारी रायगड, नाशिक, पुण्यासह सातारा घाटमाथा परिसरासाठी 'रेड अलर्ट' जारी करण्यात आला आहे, तर मुंबई आणि ठाण्यासह इतर किनारी जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

विशेषतः रायगड जिल्ह्यात पुढील दोन दिवस अतिमुसळधार पावसाचा हाय अलर्ट देण्यात आला आहे. त्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडू नये आणि लहान मुलांचे हाल होऊ नयेत, यासाठी जिल्हा प्रशासनाने तत्काळ खबरदारीचे पाऊल उचलले आहे.

रायगड जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील सर्व शाळा, अंगणवाड्या आणि महाविद्यालये ६ जुलै रोजी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळा, कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालये तसेच अंगणवाड्यांना पूर्ण सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून हे आपत्कालीन आदेश जारी केले आहेत. नागरिकांनी देखील अत्यंत आवश्यक काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

हवामान खात्याने रायगडमध्ये पुढील ४८ तास अत्यंत महत्त्वाचे असल्याचं सांगितलं आहे. मुसळधार पावसामुळे नद्या आणि नाल्यांच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होण्याची शक्यता असून सखल भागात पाणी साचू शकते. शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली असली, तरी प्रशासकीय यंत्रणा मात्र पूर्णपणे सतर्क मोडवर आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार, या सुट्टीच्या कालावधीत सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत शाळेत किंवा कार्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक आहे. स्थानिक प्रशासनाच्या आदेशानुसार या सर्व कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाच्या कामात मदत करावी लागणार आहे.

दुसरीकडे मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक आणि कोल्हापूर घाटमाथ्यावर 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे. मुंबई आणि उपनगरातही सकाळपासूनच पावसाची संततधार सुरू असल्याने सखल भागात पाणी साचण्यास सुरुवात झाली आहे. प्रशासनाने सर्व आपत्कालीन पथकांना सज्ज राहण्याचे निर्देश दिले आहेत.

## मुंबई–अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाला गती

**मुंबई (प्रतिनिधी)** – मुंबई–अहमदाबाद हायस्पीड रेल्वे (बुलेट ट्रेन) प्रकल्पासाठी, पहिल्या टनेल बोरिंग मशीनने आज विक्रोळी शाफ्टमधून वांद्रे–कुर्ला कॉम्प्लेक्समधील बांधकामाधीन मुंबई स्टेशनकडे बोगदा खोदण्याचे काम सुरू केले. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या कामाचे औपचारिक उद्घाटन करायचे होते, मात्र प्रतिकूल हवामान आणि रेड अलर्ट लक्षात घेऊन हा कार्यक्रम काल रात्रीच रद्द करण्यात आला, तरीही मशीनने आज नेहमीप्रमाणे काम सुरू केले.

प्रकल्प राबवणाऱ्या राष्ट्रीय उच्चगती रेल्वे महामंडळाने आज येथे सांगितले की, एकूण २१ किलोमीटर लांबीच्या भूमिगत बोगदा विभागापैकी मुंबईतील सावली आणि वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स दरम्यानचा १६ किलोमीटरचा भाग टनेल बोरिंग मशीनद्वारे तयार केला जाणार आहे.

## इराणचे सर्वोच्च धर्मगुरु अयातुल्ला खामेनींना शेवटचा निरोप

**तेहरान (वृत्तसंस्था)** –इराणचे माजी सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांना अखेरचा निरोप देण्यासाठी तेहरानच्या ग्रँड मसल्लात लाखो लोक जमले. शिया परंपरेनुसार काळे कपडे घातलेल्या लोकांनी छाती बडवून शोक व्यक्त केला. या सोहळ्यादरम्यान, त्यांनी रक्त सांडेल, अमेरिकेचा नाश होवो, आणि बदला, बदला अशा गगनभेदी घोषणा दिल्या. खामेनी यांच्या अंत्यविधीला तेहरानमध्ये ३ जुलै रोजी सुरुवात झाली असून ती ९ जुलैपर्यंत सुरू राहील. शुक्रवारी झालेल्या या सोहळ्याला १०० हून अधिक देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

तथापि, रशिया, चीन, भारत आणि तुर्की यांसारख्या देशांच्या सर्वोच्च नेत्यांनी या सोहळ्यात भाग घेतला नाही. इराणने निमंत्रण देऊनही, त्यांनी आपले कनिष्ठ प्रतिनिधी पाठवले. दरम्यान, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दावा केला आहे की, अमेरिकेने खामेनी यांच्या अंत्यविधीसाठी इराणला एका आठवड्याची सूट दिली आहे. ट्रम्प यांनी सांगितले की, त्यांनी मानवतावादी दृष्टिकोनातून असे केले आहे. हा सोहळा संपल्यानंतर इराणला अमेरिकेच्या अटींचे तत्काळ पालन करावे लागेल.



शिया मुस्लिम परंपरेमध्ये काळा रंग हा दुःख आणि शोकाचे प्रतीक मानला जातो. एखाद्या व्यक्तीच्या निधनानंतर दुःख व्यक्त करण्यासाठी काळे कपडे घालण्याची तिथे पद्धत आहे. अयातुल्ला खामेनी यांच्या हत्येला 'धार्मिक हौतात्म्य' म्हणून पाहिले जात आहे. त्यामुळे त्यांच्याबद्दल आदर आणि दुःख व्यक्त करण्यासाठी लोकांनी धार्मिक परंपरेनुसार काळे कपडे परिधान केले होते. सर्वांनी एकाच रंगाचे (काळे) कपडे घालून आपण सर्व एकत्र आहोत हे दाखवण्याचा प्रयत्न केला. तसेच, शत्रुराष्ट्रांविरोधात आपला निषेध आणि आक्रमकता दर्शवण्यासाठीही या रंगाचा वापर केला गेला. तेहरान, सत्तेचे केंद्र. अंत्ययात्रा तेहरानच्या ग्रँड मसल्ला येथून सुरू होईल. येथे प्रमुख धार्मिक कार्यक्रम, सरकारी समारंभ आणि शुक्रवारची नमाज आयोजित केली जाते.

## राम मंदिरातील दान चोरीप्रकरणी उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल

**मुंबई (प्रतिनिधी)** – अयोध्येतील श्रीराम मंदिरातील दान चोरीच्या विरोधात उद्धव ठाकरेंची शिवसेना आक्रमक झाली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून 'रामरक्षा आंदोलन' करण्यात आले. दादरच्या ऐतिहासिक हनुमान मंदिरात महाआरती तसेच रामरक्षा स्त्रोत आणि हनुमान चालीसा, मारुती स्त्रोत पठणाने राज्यव्यापी आंदोलनाची सुरुवात झाली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी यावेळी भाषण करताना जमलेल्या तमाम हिंदू बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो, अशी सुरुवात केली. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंनी देशातील तमाम हिंदूंना जागं केलं होतं, विखुरलेल्यांना एक केलं होतं, आजही तो क्षण आपल्या डोळ्यांसमोर आहे.

आपण कट्टर कडवट देशाभिमानी हिंदू आहोत. आम्ही हिंदू भोळे आहोत, भाबडे आहोत, पण मूर्ख नाही आहोत, आपल्या हिंदुत्वाचा गैरफायदा घेऊन जर कोणी मंदिर लुटत असेल तर मी परवाच बोललोय अब हिंदू माफ नही करेगा. या देशाची सत्ता घेताना जय श्रीरामच्या घोषणा दिल्या गेल्या, मंदिर वही बनायेंगे, पण तेव्हा शिवसैनिकांनी जेवढं काम केलं मला नाही वाटत तेवढं दुसऱ्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केलं असेल. शिला पूजन, रथयात्रा, अयोध्येत जाऊन कार सेवा केली होती, असं उद्धव ठाकरे यांनी सांगितलं.

मुंबई शहरानं जे भोगलं ते क्वचित एखाद्या शहरानं भोगलं असेल. बॉम्बस्फोट झाले, दंगली झाल्या, तेव्हा देशातील एकच मर्द शिवेसनाप्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हिंदूंच्या पाठीशी उभा राहिला होता. हिंदू भयग्रस्त होता, हिंदू आक्रमित होता, तेव्हा आधार शोधत होता, त्यावेळेला शिवसेनेचा भगवा शिवसेनाप्रमुखांनी शिवसैनिकांच्या हातात दिला.

न्यायाधीशांच्या रिक्त पदांमुळे नांदेडची न्यायव्यवस्था कोलमडण्याच्या उंबरठ्यावर

## ७ जुलैला कामकाजापासून अलिप्त राहण्याचा वकिलांचा निर्णय

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील न्यायालयांमध्ये न्यायाधीशांची मोठ्या प्रमाणावर रिक्त पदे असल्याने न्यायदान प्रक्रियेवर गंभीर परिणाम होत असून, न्याय मिळण्यास होत असलेल्या विलंबाविरोधात नांदेड जिल्हा अधिवक्ता संघासह सर्व तालुका बार असोसिएशनने ७ जुलै रोजी कामकाजातून अलिप्त राहण्याचा निर्णय घेतला आहे. ही माहिती नांदेड जिल्हा अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. यदुपत अर्धापूरकर यांनी दिली.

सध्या नांदेड जिल्हा न्यायालयात जामीन अर्जांवरील सुनावणी करण्याचा अधिकार प्रत्यक्षात केवळ एका जिल्हा न्यायाधीशांकडे असल्याने बेल व सत्र प्रकरणांवर मोठा ताण निर्माण झाला आहे. प्रमुख जिल्हा न्यायाधीशांवर संपूर्ण जिल्ह्याच्या प्रशासकीय जबाबदाऱ्यांसह न्यायालयीन कामकाजाचाही अतिरिक्त भार असल्याने प्रकरणांच्या निकालास विलंब होत असल्याचे अधिवक्त्यांचे म्हणणे आहे.

जिल्हा मुख्यालयावर सध्या केवळ दोन वरिष्ठ स्तरावरील दिवाणी न्यायालये आणि पाच ते सहा न्यायिक दंडाधिकारी प्रथम वर्ग (जेएमएफसी) न्यायालये कार्यरत आहेत. मात्र, वाढती लोकसंख्या आणि प्रलंबित प्रकरणांचा विचार करता किमान सहा वरिष्ठ स्तरावरील दिवाणी न्यायालये तसेच १२ ते १४ जेएमएफसी न्यायालयांची आवश्यकता असल्याचे अधिवक्ता संघाने स्पष्ट केले आहे. बिलोली येथे एकही जेएमएफसी न्यायाधीश कार्यरत नसून, इतर अनेक तालुक्यांत पूर्वीच्या तुलनेत न्यायाधीशांची संख्या घटल्याचेही त्यांनी नमूद केले.

न्यायाधीशांच्या नियुक्तीसाठी आणि रिक्त पदे तत्काळ भरण्यासाठी उच्च न्यायालयाकडे अनेक वेळा पाठपुरावा करण्यात आला. मात्र, वार्षिक बदली, पदोन्नती आणि अंतर्गत बदल्यांमध्ये नांदेडला अपेक्षित संख्येने न्यायाधीश न मिळाल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे.

या कमतरतेमुळे पक्षकारांना दोन ते तीन महिन्यांनंतर तारखा मिळत असून, जामीन अर्जांवरही चार–पाच सुनावण्यांची प्रतीक्षा करावी लागत आहे. साक्षी–पुरावे आणि फौजदारी खटल्यांच्या सुनावण्यांनाही विलंब होत असून, कारागृहातील आरोपींची प्रकरणेही रखडत आहेत. परिणामी न्यायालयीन यंत्रणा, पक्षकार आणि अधिवक्ते यांच्यावर मोठा ताण निर्माण झाला असून न्यायालय परिसरात वादाच्या घटनाही वाढत असल्याचे अधिवक्ता संघाने म्हटले आहे. ७ जुलैच्या आंदोलनानंतरही परिस्थितीत सुधारणा झाली नाही, तर लोकअदालतीवर बहिष्कारासह अधिक तीव्र आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याचा इशारा अधिवक्ता संघाने दिला आहे.

## भारतीय नौदलाच्या ताफ्यात 'आयएनएस महेंद्रगिरी' व 'आयएनएस मालवण'

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – भारतीय नौदलाची सागरी ताकद आणखी वाढणार असून लवकरच 'आयएनएस महेंद्रगिरी' आणि 'आयएनएस मालवण' या दोन अत्याधुनिक युद्धनौका नौदलाच्या ताफ्यात अधिकृतपणे सामील होणार आहेत. या दोन्ही युद्धनौकांमुळे भारताची किनारी सुरक्षा, सागरी गस्त आणि पाणबुडीविरोधी क्षमता अधिक मजबूत होणार असून देशाच्या सागरी संरक्षणाला नवे बळ मिळणार आहे.

गेल्या महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते कोलकाता येथे 'आयएनएस अग्रय', 'आयएनएस संशोधक' आणि 'आयएनएस द्रोणागिरी' या तीन युद्धनौकांचे राष्ट्राला समर्पण करण्यात आले होते. त्यानंतर आता 'आयएनएस महेंद्रगिरी' आणि 'आयएनएस मालवण' ही नौदलात दाखल करण्याची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. 'आयएनएस मालवण' ही अँटी–सबमरीन वॉरफेअर शॅलो वॉटर क्राफ्ट प्रकारातील युद्धनौका असून तिची निर्मिती कोचीन शिपयार्डमध्ये करण्यात आली आहे. **(पान ३ वर...)**

## मुंबईत मुसळधार पावसात दुर्घटना; ३ मजली बांधकाम कोसळले

**मुंबई (प्रतिनिधी)** – मुंबईत गेल्या काही तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या हाहाकारादरम्यान एक अत्यंत मोठी आणि धक्कादायक दुर्घटना घडली आहे. मुंबईतील मानखुर्द परिसरात एक तीन मजली बांधकाम अचानक कोसळले आहे. या भीषण दुर्घटनेत इमारतीच्या ढिगाऱ्याखाली ३ जण अडकल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन, अग्निशमन दल आणि एनडीआरएफचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर मदतकार्य सुरू करण्यात आले आहे.

मुंबईत आधीच हवामान खात्याने मुसळधार पावसाचा इशारा दिलेला असताना, मानखुर्द भागात ही दुर्घटना घडली. हे तीन मजली बांधकाम अचानक पत्त्यासारखे कोसळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. ढिगाऱ्याखाली नेमके किती जण आहेत, याचा अचूक आकडा अद्याप समजू शकलेला नसला तरी प्राथमिक अंदाजानुसार ३ ते ४ जण ढिगाऱ्याखाली अडकले आहेत.

घटनेची गांभीर्य लक्षात घेऊन अग्निशमन दलाच्या गाड्या आणि एनडीआरएफच्या जवानांनी तातडीने धाव घेतली आहे. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले जात आहेत. स्थानिक रहिवासी देखील प्रशासनाला मदत करत आहेत. स्थानिक नगरसेवक नवनाथ बन यांनीही तातडीने घटनास्थळी पोहोचून परिस्थितीची पाहणी केली असून मदतकार्याला गती देण्याच्या सूचना दिल्या आहेत. मुंबईतील सततच्या पावसामुळे बचावकार्यात काही प्रमाणात अडथळे येत आहेत, मात्र यंत्रणा ढिगाऱ्या उपसण्याचे काम वेगाने करत आहे.

## इंस्टाग्रामवरील बाल लैंगिक शोषणाच्या जाहिरातींप्रकरणी सरकारची मेटाला नोटीस

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – केंद्र सरकारने इंस्टाग्रामवरील सशुल्क जाहिरातींद्वारे प्रसारित होणाऱ्या बाल लैंगिक शोषण आणि गैरवापराशी (सीएसइएम) संबंधित मजकुरासंदर्भात मेटाला एक कठोर नोटीस बजावली आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने इंस्टाग्रामला सीएसइएमला प्रोत्साहन देणाऱ्या किंवा अशा मजकुरापर्यंत पोहोचण्यास मदत करणाऱ्या सर्व जाहिराती आणि मजकूर काढून टाकण्याचे निर्देश दिले आहेत. सरकारने मेटाकडून सात दिवसांच्या आत सविस्तर प्रतिसाद मागितला असल्याची माहिती आहे.

मंत्रालय मेटाच्या मजकूर नियंत्रण प्रणाली, जाहिरात पुनरावलोकन प्रक्रिया आणि त्यांच्या प्लॅटफॉर्मवरील बेकायदेशीर व हानिकारक मजकुराविरोधातील कारवाई अधिक तीव्र करण्यासाठी उचललेल्या पावलांविषयी सविस्तर माहिती देखील मागू शकते.

यापूर्वी, मंत्रालयाने मेटाला विचारले होते की, इंस्टाग्रामवर अशा जाहिराती कशा प्रसारित होतात आणि त्या थांबवण्यासाठी प्लॅटफॉर्मने कोणती पावले उचलली आहेत. तसेच, बाल लैंगिक शोषणाशी संबंधित मजकुराला प्रोत्साहन देणाऱ्या जाहिराती थांबवण्यासाठी कंपनी कोणती पावले उचलत आहे, असेही विचारण्यात आले होते. दरम्यान, मेटा टीमने व्हॉट्सॲपच्या युझरनेम फीचरसंदर्भात इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि सविस्तर प्रतिसाद देण्यासाठी तीन दिवसांची मुदत मागितली. यानंतर, मंत्रालयाने मेटाला नोटीस बजावली. भारत सरकारने अलीकडेच व्हॉट्सॲपच्या युझरनेम फीचरच्या अंमलबजावणीला स्थगिती दिली आहे. यावर प्रतिक्रिया देताना, व्हॉट्सॲपने स्पष्ट केले की, त्यांचे नवीन युझरनेम फीचर पूर्णपणे ऐच्छिक असेल. कंपनीने सांगितले की, ओळख चोरी, ऑनलाइन फसवणूक आणि अवांछित संपर्क यांसारख्या समस्या टाळण्यासाठी हे फीचर लागू करण्यापूर्वी अनेक सुरक्षा उपाययोजना जोडण्यात आल्या आहेत.

## अमूल चॉकलेटमध्ये अकोल्यात आढळल्या आळ्या

**अकोला (प्रतिनिधी)** – प्रसिद्ध ब्रँड आणि नामांकित कंपन्यांच्या खाद्यपदार्थांमध्ये वेगवेगळ्या वस्तू किंवा कीटक आढळण्याच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. आता असाच एक अत्यंत संतापजनक आणि धक्कादायक प्रकार अकोला जिल्ह्यातून समोर आला आहे. सर्वांचा लाडका ब्रँड असलेल्या 'अमूल' कंपनीच्या चॉकलेटमध्ये चक्क जिवंत अळ्या वळवळताना आढळून आल्या आहेत. यामुळे अमूल चॉकलेट खाणाऱ्या ग्राहकांमध्ये विशेषतः लहान मुलांच्या पालकांमध्ये मोठी खळबळ उडाल्याचं चित्र आहे.


अकोल्यातील एका जागरूक नागरिकाने हा प्रकार कॅमेऱ्यात कैद केला असून, हा व्हीडीओ सध्या



सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर वाऱ्यासारखा व्हायरल होत आहे. या गंभीर प्रकारानंतर संबंधित पालकाने अन्न आणि औषध प्रशासनासह ग्राहक मंचाकडे धाव घेतली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अकोला शहरातील कौलखेड भागातील रहिवासी संतोष शेंदूरसे यांनी आपल्या लहान मुलासाठी जवळच्याच एका दुकानातून अमूल कंपनीचे चॉकलेट खरेदी केलं होतं. मूल चॉकलेट खाण्यासाठी हट्ट करत असल्याने त्यांनी घरी गेल्यावर चॉकलेटचे रॅपर उघडलं. मात्र, चॉकलेट उघडताच त्यांना मोठा धक्का बसला. त्या चॉकलेटवर लहान–लहान जिवंत आळ्या वळवळत असल्याचं त्यांच्या निदर्शनास आलं. संतोष शेंदूरसे यांनी वेळीच लक्ष दिल्यानं त्यांचा मुलगा हे चॉकलेट खाण्यापासून वाचला, अन्यथा एका लहान मुलाला मोठ्या अन्नबाधेला सामोरं जावं लागलं असतं.

नामांकित कंपन्यांच्या अशा निष्काळजीपणामुळे ग्राहकांच्या आरोग्याशी थेट खेळ केला जात असल्याचा आरोप आता केला जात आहे.




## ठाकरे सेनेच्या महानगर प्रमुखांसह ४ पदाधिकाऱ्यांना पोलिसांकडून नोटीस

**नांदेड (प्रतिनिधी)**– शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे सहा खासदार शिंदे गटात गेल्यानंतर नांदेड रेल्वे डिव्हिजनमध्ये उद्या होणाऱ्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर नांदेड पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांना नोटिसा बजावल्या आहेत.

नांदेड रेल्वे डिव्हिजनमध्ये गद्दार खासदारांची पहिल्यांदाच बैठक होत असल्याने ठाकरे सेनेकडून तीव्र विरोध होण्याची शक्यता आहे. हा कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न लक्षात घेऊन पोलिसांनी ठाकरे सेनेचे पदाधिकारी शिवसेना महानगर प्रमुख प्रकाश मारावार, उपजिल्हाप्रमुख विजय बगाटे,

### नांदेड रेल्वे विभागाची आज खासदारांसोबत बैठक



नवज्योतसिंग गाडीवाले, युवा सेनेचे सचिन पाटील यांच्यासह इतरांना पोलीस ठाण्यात बोलावून नोटिसा दिल्या.

नांदेड जिल्ह्यात गद्दार खासदारांच्या विरोधात शिव–सैनिकांमध्ये प्रचंड रोष आहे. या पार्श्वभूमीवर सत्ताधारी शिंदे गट पोलिसांच्या माध्यमातून निष्ठावान शिवसैनिकांची मुस्कटदाबी करत असल्याचा आरोप ठाकरे सेनेने केला आहे. नांदेडमधील विविध पोलीस ठाण्यांमधून निष्ठावान शिवसैनिकांना विनाकारण नोटिसा बजावून त्यांचे मनोधैर्य खच्ची करण्याचा प्रयत्न होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

यावेळी नोटीस मिळाल्यानंतर प्रकाश मारावार, विजय बगाटे, नवज्योतसिंग गाडीवाले आणि सचिन पाटील यांनी सांगितले की, येणाऱ्या काळात जनता गद्दार खासदारांना त्यांची जागा दाखवेल.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन आणि उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेश पुरी यांनी कायदा–सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी संबंधित पदाधिकाऱ्यांना नोटिसा बजावल्याची माहिती दिली.

## मुंबईसह राज्यात पावसाचा कहर; धरणांमधील पाणीसाठ्यात वाढ

**मुंबई (प्रतिनिधी)** – मुंबई, ठाण्यासह महाराष्ट्रात मान्सूनचा जोर वाढला असून पुढचे चार दिवस ही स्थिती अशीच राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे ७ तारखेपर्यंत राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाचा हाहाकार सुरू राहणार आहे. हवामान विभागाने पुढच्या तीन दिवसांसाठी मुंबईसह ठाणे, पालघर, रायगड, पुणे, सातारा जिल्ह्यांसाठी 'रेड अलर्ट' जारी केला असून अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. काही ठिकाणी ताशी ६० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे.

दरम्यान मुंबईत अनेक ठिकाणी झाडे पडण्याच्या घटना घडल्या आहेत. यामध्ये जीवितहानी झाली नसली तरी मोठ्या प्रमाणावर वित्तहानी झाल्याची माहिती समोर येत आहे. दादरमधील शिवसेना भवन समोरील मार्गावर झाडं पडले. तसेच वांद्रे येथे उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या वाहनांच्या ताफ्यासमोर झाड पडले. त्यामुळे काही काळ ताफा थांबवावा लागला. कालांतराने रस्ता मोकळा झाल्यावर ताफा पुढे मार्गस्थ झाला.मुंबई उपनगरातील कुर्ला कमानी येथील गोम्स टाऊन इमारतीजवळ असणा–या दुकानावर झाड पडून त्यात युनुस कुंडावाला, वय ६३ वर्षे यांचा मृत्यू झाल्याचे फौजिया रुग्णालयातून कळविण्यात आले आहे. मुंबईतील पावसामुळे रेल्वे मंत्रालयाने बुलेट ट्रेनच्या बोगदा खोदण्याच्या कामाचा औपचारिक शुभारंभ पुढे ढकलला आहे. हवामानामुळे रेल्वे मंत्रालयाने बुलेट ट्रेनच्या बोगदा खोदकामाच्या शुभारंभास विलंब **(पान ३ वर...)**

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# बाल गुन्हेगारीवरील उपाय अघोरी नको

महाराष्ट्रात संघटित गुन्हेगारीचे बदलते स्वरूप अधिक चिंताजनक बनत आहे. मादक पदार्थांची तस्करी, खंडणी, दरोडे आणि अगदी सुपारी हत्या यांसारख्या गंभीर गुन्ह्यांसाठी अल्पवयीन मुलांचा वापर करण्याची प्रवृत्ती वाढत असल्याचे चित्र समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा अधिक कठोरपणे लागू करून अशा गुन्हेगारी टोळ्यांतील सूत्रधारांवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. याचा अर्थ यापूर्वी हा कायदा अस्तित्त्वात असताना देखील त्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होत नव्हती. असो, तरीही हा निर्णय स्वागतार्ह असला तरी त्याचबरोबर अल्पवयीन मुलांची वयोमर्यादा १८ वरून १६ वर्षांवर आणण्याचा प्रस्ताव अनेक प्रश्न निर्माण करणारा आहे. आज अनेक गुन्हेगारी टोळ्या कायद्यातील त्रुटींचा फायदा घेत आहेत. अल्पवयीन मुलांना शिक्षा कमी होते किंवा त्यांच्यावर पुनर्वसनाचा दृष्टिकोन ठेवला जातो, हे माहीत असल्याने गुन्हेगारीचे सूत्रधार मुलांना पैशाचे आमिष, मानसिक दबाव किंवा धमकी देऊन गुन्ह्यांत ढकलतात. काही घरांमध्ये गुन्हेगारी करण्याचे संस्कार मुद्दाम दिले जातात, कारण त्यांचे पालक या क्षेत्रामध्ये कार्यरत असतात. परिणामी, गुन्हा करणारे हात लहान असतात; पण त्यामागचा मेंदू मोठ्या गुन्हेगारी जाळ्याचा असतो. अशा परिस्थितीत केवळ मुलांवर कारवाई करून समस्या सुटत नाही. त्यामागील टोळ्या उद्ध्वस्त करणे हीच खरी गरज आहे. याच दृष्टीने मोक्का अंतर्गत अशा सूत्रधारांवर कठोर कारवाई करण्याचा निर्णय योग्य आहे. गुन्हा घडवून आणणाऱ्या, त्याचे नियोजन करणाऱ्या किंवा अल्पवयीन मुलांचा वापर करणाऱ्या प्रत्येक प्रौढ व्यक्तीला संघटित गुन्हेगारीचा भाग मानले गेले पाहिजे. तसेच अशा आरोपींच्या पालकांना प्रथम अटक करून त्यांच्यावर कारवाई केली गेली पाहिजे. कारण अल्पवयीन मुलांची जबाबदारी ही कायद्यानुसार पालकांचीच असते. अशा आरोपींना सहज जामीन मिळू नये, विशेष न्यायालयांत जलद खटले चालावेत आणि कठोर शिक्षा व्हावी, यामुळे गुन्हेगारी टोळ्यांवर निश्चितच अंकुश बसू शकतो. मात्र, याचवेळी अल्पवयीन मुलांची वयोमर्यादा १८ वरून १६ वर्षांवर आणण्याचा प्रस्ताव तितकाच संवेदनशील आहे. एखादा १६ किंवा १७ वर्षांचा मुलगा गंभीर गुन्ह्यात सहभागी असला तरी तो अनेकदा स्वतःच्या इच्छेने नव्हे, तर दबाव, गरिबी, व्यसन किंवा चुकीच्या संगतीमुळे त्या मार्गावर गेलेला असतो. अशा मुलाला थेट प्रौढ गुन्हेगार मानल्यास त्याच्या पुनर्वसनाची संधी हिरावली जाऊ शकते. भारताने २००० मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या बालहक्क करारानुसार १८ वर्षे ही अल्पवयीनतेची समान मर्यादा स्वीकारली. २०१२ च्या निर्भया प्रकरणानंतर संतापाच्या लाटेत २०१५ मध्ये कायद्यात बदल करण्यात आला. त्यानुसार १६ ते १८ वयोगटातील मुलांनी गुन्हा केल्यास त्यांच्या मानसिक व बौद्धिक परिपक्वतेचे मूल्यमापन करून त्यांच्यावर प्रौढांप्रमाणे खटला चालविण्याची तरतूद आधीच अस्तित्वात आहे. त्यामुळे संपूर्ण वयोमर्यादा कमी करण्याऐवजी विद्यमान कायद्याची प्रभावी अंमलबजावणी अधिक उपयुक्त ठरू शकते. समाजानेही या समस्येकडे केवळ कायद्याच्या चष्म्यातून पाहून चालणार नाही. कुटुंबातील दुर्लक्ष, शिक्षणाचा अभाव, बेरोजगारी, व्यसनाधीनता, सोशल मीडियाचा गैरवापर आणि गुन्हेगारीचे आकर्षण यामुळे अनेक मुले चुकीच्या मार्गावर जात आहेत. त्यामुळे पोलीस कारवाईसोबतच शिक्षण, समुपदेशन, कौशल्यविकास आणि पुनर्वसन यांनाही तितकेच महत्त्व द्यावे लागेल. गुन्हेगारीविरोधातील लढाईत कठोर कायद्यांची गरज असते; पण त्याहून अधिक गरज असते ती न्याय आणि संवेदनशीलतेचा समतोल राखण्याची. गुन्हेगारी टोळ्यांच्या म्होरक्यांवर कठोर कारवाई करणे हा योग्य मार्ग आहे. मात्र, प्रत्येक अल्पवयीन गुन्हेगारामागील सामाजिक वास्तव समजून घेतले नाही, तर आपण गुन्हेगारीची मुळे नष्ट करण्याऐवजी आणखी एक हरवलेली किंबहुना बिघडलेली पिढी निर्माण करण्याचा धोका पत्करू. याचा संपूर्ण परिणाम समाजावर आणि देशाच्या अखंडतेवर नक्कीच होणार. महाराष्ट्राने संघटित गुन्हेगारीवर कठोर प्रहार करतानाच बालहक्क, पुनर्वसन आणि न्याय यांचा समतोल राखला, तरच हा निर्णय खऱ्या अर्थाने परिणामकारक ठरेल.

# ग्रामीण विकास : निसर्ग, संस्कृती आणि प्रगतीचा संगम



दरवर्षी ६ जुलै रोजी जागतिक ग्रामीण विकास दिवस साजरा केला जातो.संयुक्त राष्ट्रांनी शाश्वत विकास साध्य करण्यासाठी आणि ग्रामीण भागातील समस्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी या दिनाची अधिकृत घोषणा केली आहे. भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. देशाच्या विकासाचा खरा पाया ग्रामीण भागात आहे. ग्रामीण विकास म्हणजे केवळ भौतिक सुविधांची उभारणी नव्हे, तर शिक्षण, आरोग्य, शेती, रोजगार, पायाभूत सुविधा, पर्यावरण संवर्धन आणि सांस्कृतिक वारसा यांचा समतोल साधून गावांचा सर्वांगीण विकास करणे होय. निसर्गाशी सुसंवाद राखत, परंपरांचे जतन करत आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून आत्मनिर्भर, सक्षम व समृद्ध गावांची निर्मिती करणे हे ग्रामीण विकासाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यामुळे ग्रामीण विकास : निसर्ग, संस्कृती आणि प्रगतीचा संगम ही संकल्पना आजच्या काळात अधिक महत्त्वाची ठरते.

ग्रामीण विकास म्हणजे केवळ रस्ते, वीज आणि इमारती उभारणे नव्हे, तर निसर्गाचे संवर्धन, सांस्कृतिक वारशाचे जतन आणि आधुनिक विकासाचा समतोल साधून गावांचा सर्वांगीण विकास करणे होय. ग्रामीण विकासामध्ये निसर्गाशी सुसंवाद राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण ग्रामीण जीवन थेट निसर्गावर अवलंबून असते. शेती, पाणी, जंगल आणि जमीन या सर्व नैसर्गिक संसाधनांवर ग्रामीण अर्थव्यवस्था उभी आहे. त्यामुळे विकास करताना निसर्गाचे संरक्षण आणि संवर्धन यांना सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे.

जलसंधारण हा ग्रामीण विकासाचा एक महत्त्वाचा घटक आहे. पावसाच्या पाण्याचे योग्य संकलन करून त्याचा उपयोग शेती, पिण्याचे पाणी आणि भूजल पातळी वाढवण्यासाठी करता येतो. शेततळी, बंधारे आणि विहिरींचे पुनर्भरण यांसारख्या उपाययोजनांमुळे पाणीटंचाईवर नियंत्रण मिळवता येते.

वृक्षारोपण आणि मृदसंवर्धन यांनाही विशेष महत्त्व आहे. झाडांची संख्या वाढवल्याने हवामान संतुलित राहते, पावसाचे प्रमाण टिकून राहते आणि पर्यावरण शुद्ध राहते. मातीची धूप थांबवून जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी सेंद्रिय शेती आणि योग्य शेती पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे. नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत व जबाबदारीने वापर करणे ही काळाची गरज आहे. पाणी, जमीन, जंगल आणि इतर संसाधनांचा अतिरेक वापर टाळून पुढील पिढ्यांसाठी त्यांचे संरक्षण करणे महत्त्वाचे आहे. स्वच्छ, हरित आणि प्रदूषणमुक्त गावांची निर्मिती हे ग्रामीण विकासाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. घनकचरा व्यवस्थापन, प्लास्टिकमुक्त परिसर आणि स्वच्छता मोहिमा यांमुळे गावांचे आरोग्यदायी वातावरण तयार होते.

जैवविविधतेचे संरक्षण करणेही तितकेच आवश्यक आहे. स्थानिक वनस्पती, प्राणी आणि पक्ष्यांचे संवर्धन करून पर्यावरणीय संतुलन राखता येते आणि नैसर्गिक साखळी टिकवून ठेवता येते. निसर्गाशी सुसंवाद साधून विकास केल्यासच ग्रामीण भागाचा शाश्वत आणि सर्वांगीण विकास शक्य होतो. त्यामुळे निसर्गाचे जतन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

ग्रामीण विकासामध्ये संस्कृतीचे जतन करणे हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. भारताची खरी ओळख त्याच्या समृद्ध लोकसंस्कृतीमध्ये आहे आणि ही संस्कृती विशेषतः गावांमध्ये जपलेली दिसते. त्यामुळे ग्रामीण विकासाबरोबरच सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करणे आवश्यक ठरते.

लोककला, लोकपरंपरा, लोकसाहित्य आणि लोकउत्सव यांचे संवर्धन करणे ही समाजाची जबाबदारी आहे. गावांमध्ये साजरे होणारे विविध सण, जत्रा, नृत्य, गायन आणि नाट्यप्रकार हे आपल्या संस्कृतीचे जिवंत दर्शन घडवतात. या परंपरांचे जतन केल्यास पुढील पिढ्यांना आपली ओळख आणि मुळे समजण्यास मदत होते. आधुनिक शेती, तंत्रज्ञान आणि नवकल्पनांचा स्वीकार हा ग्रामीण प्रगतीचा पाया आहे. पारंपरिक शेती पद्धतींबरोबरच आधुनिक यंत्रसामग्री, सेंद्रिय शेती आणि स्मार्ट शेती तंत्रज्ञानाचा वापर केल्यास उत्पादन वाढते आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न सुधारते.

शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि डिजिटल सुविधांचा विस्तार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. दर्जेदार शिक्षणामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी सक्षम बनतात, तर चांगल्या आरोग्य सुविधांमुळे समाज निरोगी राहतो. स्वच्छता मोहिमा आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे गावांचा विकास वेगाने होतो. रोजगारनिर्मिती, महिला सक्षमीकरण आणि युवकांना कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे हे ग्रामीण विकासाचे महत्त्वाचे घटक आहेत. कौशल्य प्रशिक्षण, स्वयंरोजगार योजना आणि लघुउद्योग यांमुळे बेरोजगारी कमी होते आणि आर्थिक स्वावलंबन वाढते. ग्रामीण उद्योजकता आणि स्वयंरोजगाराला चालना देणेही आवश्यक आहे. स्थानिक संसाधनांचा वापर करून छोटे उद्योग सुरू केल्यास गावातील अर्थव्यवस्था मजबूत होते आणि स्थलांतर कमी होते.

सर्वांगीण प्रगतीमुळे ग्रामीण भाग आत्मनिर्भर, सक्षम आणि विकसित बनतो. त्यामुळे ग्रामीण विकास हा खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक असणे गरजेचे आहे.

ग्रामीण विकासामध्ये लोकसहभाग हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कोणत्याही गावाचा खरा आणि शाश्वत विकास तेव्हाच शक्य होतो, जेव्हा त्या गावातील नागरिक विकास प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी होतात. लोकांच्या सहभागामुळे विकास योजनांना दिशा मिळते आणि त्या अधिक परिणामकारक ठरतात. लोकसहभागातून विकास केल्यास गावांचा विकास अधिक पारदर्शक, शाश्वत आणि सर्वसमावेशक बनतो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने विकास प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे.

ग्रामीण विकासाचा अंतिम उद्देश म्हणजे शाश्वत भविष्याची वाटचाल सुनिश्चित करणे. शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो सध्याच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम करत नाही. त्यामुळे आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय विकासाचा समतोल राखणे अत्यंत आवश्यक आहे. आर्थिक विकासामुळे ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावते. शेती, उद्योग, रोजगारनिर्मिती आणि स्वयंरोजगाराच्या संधी वाढवल्यास ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होते. मात्र हा विकास पर्यावरणाला हानी न पोहोचवता साधणे आवश्यक आहे.

सामाजिक विकासामध्ये शिक्षण, आरोग्य, समानता आणि सामाजिक न्याय यांचा समावेश होतो. सर्व नागरिकांना समान संधी मिळाल्यास समाज अधिक सक्षम आणि स्थिर बनतो. ग्रामीण भागात सामाजिक ऐक्य आणि सहकार्य वाढविणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. पर्यावरणीय विकास हा शाश्वत भविष्याचा पाया आहे. निसर्गाचे संवर्धन, जलसंधारण, वृक्षारोपण आणि प्रदूषण नियंत्रण यांसारख्या उपाययोजनांमुळे पर्यावरणाचा समतोल राखला जातो. त्यामुळे पुढील पिढ्यांसाठी संसाधने सुरक्षित राहतात.

आत्मनिर्भर, सक्षम आणि समृद्ध गावांची निर्मिती हे शाश्वत विकासाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. जेव्हा गाव स्वतःच्या संसाधनांवर आधारित विकास साधते, तेव्हा ते अधिक स्थिर आणि मजबूत बनते. विकसित गाव विकसित भारत या संकल्पनेला बळकटी देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. गावांचा विकास झाल्यासच देशाचा सर्वांगीण विकास शक्य आहे.

निष्कर्षतः, शाश्वत भविष्याची वाटचाल हीच खरी प्रगती असून, त्यासाठी सर्व घटकांचा समतोल विकास आवश्यक आहे. निसर्गाचे संवर्धन, संस्कृतीचे जतन आणि सर्वांगीण प्रगती यांचा समतोल साधणारा ग्रामीण विकासच समृद्ध, स्वावलंबी आणि विकसित भारताचा खरा पाया आहे.

**-डॉ. शिवराज कदम**
नांदेड.
मो. ९७६७८३०४९८

# वाचनसंस्कृती आणि आजची पिढी



शहरात वा खेड्यात वास्तव्य करणाऱ्या बहुतेकांना कोणते ना कोणते मादक पदार्थ सेवन करण्याची सवय लागलेली आहे. त्यातच दारू, गांजा, तंबाखू, सिगारेट यांसारख्या शरीराला घातक असलेल्या पदार्थाचे सेवन अत्यंत घातक आहे. कालपरवा नांदेड जिल्ह्यातील खेड्यात वास्तव्य करणाऱ्या वृद्ध व्यक्तीचा फोन आला.त्यांनी तरुण व्यक्तीविषयी एक खंत व्यक्त केली की, आजचे तरुण व्यसनाच्या आहारी गेलेले आहेत त्यांना उद्बोधन होईल असं लेखन आपल्याकडून अपेक्षित असल्याचे सुचविण्यात आले. त्यामुळे या विषयावर लेखन करणे आवश्यक गरज बनली आहे हे मनात ठरवून लिहायला लागलो. वृद्ध व्यक्तीने मादक पदार्थ वा चाय पिण्यापेक्षा वर्तमानपत्र विकत घेऊन वाचन संस्कृती रुजवत असल्याने मला अत्यंत आनंद झाला. आज सोशल मीडियाचा युग आला असल्याने वाचन संस्कृतीपासून तरुण-तरुणी दुरावत असल्याचे चित्र दिसून येते. जुनी पिढी अजूनही ऑफलाईन दुनियेच्या वस्तुस्थितीत व व्यसनाच्या दूर राहून जीवन व्यतीत करीत असल्याचे दिसून येते.

कामगार, मजूर, शेतमजूर शारीरिक कष्ट करून सायंकाळी नशेच्या आहारी जात असल्याचे दिसून येत आहे. शारीरिक कष्ट करणारी व्यक्ती जास्तीत जास्त दारूच्या नशेत पैशाचा अपव्यय करीत असल्याने त्यांच्या संसारावर विपरीत परिणाम होत आहे. दारू पिणाऱ्या व्यक्तीला त्याचा दुष्परिणाम लक्षात येत नसला तरी कौटुंबिक व सामाजिक परिणाम अतिप्रमाणात होत असल्याने आई-वडील, पत्नी, मुले यांच्याकडे दुर्लक्ष होत आहे, म्हणून मादक पदार्थाचे सेवन करण्याऐवजी मुला-बाळांना तेवढ्याच पैशाचे खाऊ घेऊन गेल्यास घरी मुले खुश होतील. त्यामुळे संसारावर येणारा ताण दूर सारण्यासाठी दारूचे सेवन करणे टाळायला हवे. दारू, गांज्या यामुळे समाजजीवनावर होणारे परिणाम टाळण्यासाठी व संसार जोडण्यासाठी दारू सोडा, संसार जोडा असे सांगण्याची गरज निर्माण झाली आहे.

जीवन जगत असताना बऱ्याचदा सण, समारंभ, आनंद अशा वेळी दारूचे सेवन केले जाते. मित्राच्या सहवासात असताना एकमेकांच्या आग्रहाने आनंद व्यक्त करण्याच्या नादात एकच प्याला म्हणून घेतलेला घातक ठरत असतो. हळूहळू शरीराला त्याची सवय होत जाते. दारू, गांज्या यांसारख्या मादक पदार्थामुळे नशा येऊन त्याचा यकृतावर परिणाम जाणवू लागतो.ही एक प्रकारची लत असून प्रथमतः आपण दारूला पीत असतो नंतर संपूर्ण शरीर अल्कोहोलिक होऊन शरीरच दारूची मागणी करीत असल्याने मादक पदार्थापासून दूर जाणे अवघड होते. तरीदेखील दारूपासून मुक्ती मिळविणे अशक्य नाही, कारण दारूचे सेवन करणे व वर्ज करणे अखेर स्वतःच्या मनावर अवलंबून असते. दारूचे सेवन करीत असल्याने दिवसभर काम केल्यावर आलेल्या पैशाचा संसारासाठी वापर न करता दारूच्या पाण्यापायी पैशाची उधळण करीत असतो. त्यामुळे कित्येक संसार उघड्यावर पडलेले असून त्यांचे कुटुंबातील सदस्य उपाशी झोपतात. असे कितीतरी कुटुंब त्यांच्या एका व्यक्तीच्या दारू पिण्यामुळे मुलं देखील वाईट व्यसनाकडे वळलेले आहेत. त्यामुळे गुन्हेगारी, चोरी, खून यांसारख्या वाईट गोष्टींकडे वळलेले आहेत. तसेच वडील दारूच्या नशेत असल्याने शिक्षण अर्धवट सोडून बालमजुरी करावी लागत असल्याचे विचित्र चित्र दिसत असल्याने दारू सोडा...संसार जोडा असं आर्जवपणे म्हणावे लागते आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील झेप ही व्यसनमुक्ती संघटना कार्यरत आहेत. तसेच शेषराव महाराज व्यसनमुक्ती संघटना आज संपूर्ण महाराष्ट्रात कार्यरत आहेत. म्हणून आपल्या आजूबाजूच्या परिसरात दारूचे व्यसन करणाऱ्या व्यक्तीला व्यसनमुक्ती संघटनेत नेऊन सुखी संसार करण्यासाठी प्रत्येकांनी पुढाकार घ्यायला हवा.

कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईट असतो हे सर्वांना ज्ञात आहे, म्हणूनच म्हटले जाते की, अति तिथे माती ही म्हण त्याठिकाणी चपखल बसू शकते. माझ्या गावाला तसेच अवतीभवती चोवीस तास नशेच्या आहारी राहणारे व्यक्ती देखील दारूपासून दूर झालेले आहे आणि संसाररूपी रथ सुंदररित्या सांभाळत आहेत त्यामुळे त्यांना मार्ग दाखविणारे गुरू मिळाले अन्यथा त्यांची अंतिम प्रेतयात्राच निघाली असती हे सत्य आहे.म्हणून अशी स्थिती येऊ नये, तरुणपणात जग सोडून जाणे म्हणजे पत्नीला विधवा व मुलांना अनाथ करून सोडणे होय. या पृथ्वीवर जन्माला आल्यानंतर सत्कार्य करण्याचे सौभाग्य प्रत्येकाला लाभायला हवे. यासाठी दारू या विषयुक्त नशेच्या आहारी न जाता कुटुंबाच्या प्रेमात, आपुलकीत, स्नेहात राहून कुटुंब ही संकल्पना मनात रुजवायला हवी.आज कित्येक जण नशेच्या आहारी आहेत, पण यात कोणाचेही नाव लिहिणे हे उचित वाटत नाही. प्रत्येकांनी दारूचे व्यसन न करता चांगल्या कार्याचे, गोष्टीचे व्यसन करण्यास प्रोत्साहित करायला हवे. स्वतःसाठी जगता जगता इतरांसाठी जगण्याचा कानमंत्र हाती घ्यायला हवा.गावातील तरुण एकत्र येऊन व्यसनमुक्ती संघटना स्थापन करून व्यसन करणाऱ्या व्यक्तीवर अंकुश ठेवायला हवा. गावातील कुटुंब आनंदी तर गाव आनंदी आणि गाव आनंदी तर तालुका, जिल्हा, राज्य, देश आनंदी होईल आणि दारू सोडा... संसार जोडा ही संकल्पना विस्ताराला चालना मिळेल.

**-दुशांत बाबुराव निमकर**
शब्दांकुर फाऊंडेशन,
गोंडपिपरी
मो. ९७६५५४८९४९

# भारतातही फुटबॉल संस्कृती रुजायला हवी!

फुटबॉल हा जगातील सर्वाधिक लोकप्रिय खेळ मानला जातो. जगातील जवळपास प्रत्येक देशात हा खेळ खेळला जात असल्याने त्याला खेळांचा राजा असेही म्हटले जाते. या खेळाचा सर्वात मोठा आणि प्रतिष्ठेचा सोहळा म्हणजे फिफा विश्वचषक. फुटबॉलप्रेमींसाठी हा स्पर्धा महोत्सव म्हणजे अक्षरशः कुंभमेळाच. यंदाचा २०२६ चा विश्वचषक अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या तीन देशांनी संयुक्तपणे आयोजित केला असून प्रथमच ४८ संघांच्या सहभागामुळे स्पर्धेचे स्वरूप अधिक व्यापक आणि रोमांचक झाले आहे.

यापूर्वी विश्वचषकात ३२ संघ सहभागी होत असत. मात्र यंदापासून ४८ संघांचा समावेश करण्यात आला आहे. १२ गटांमध्ये विभागलेल्या या स्पर्धेत प्रत्येक गटातील अव्वल दोन संघांसह सर्वोत्तम आठ तिसऱ्या क्रमांकाच्या संघांनाही बाद फेरीत प्रवेश मिळत आहे. त्यामुळे अधिक देशांना जागतिक स्तरावर स्वतःचे कौशल्य दाखवण्याची संधी मिळाली आहे.

यंदाच्या विश्वचषकात अनेक धक्कादायक निकाल पाहायला मिळाले. बलाढ्य संघांना अनपेक्षित पराभव पत्करावा लागला, तर काही नवोदित संघांनी आपल्या खेळाने जगाला चकित केले. त्यापैकी सर्वाधिक चर्चेत राहिला तो आफ्रिकेतील छोटासा केप वर्दे देश. अवघी सुमारे सहा लाख लोकसंख्या असलेल्या या देशाने प्रथमच विश्वचषकासाठी पात्रता मिळवली आणि बाद फेरीपर्यंत मजल मारत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अर्जेंटिनाविरुद्ध अखेरच्या क्षणी गोल स्वीकारल्यामुळे त्यांचा प्रवास थांबला; पण त्यांनी फुटबॉलप्रेमींची मने जिंकली. आकाराने लहान असला तरी जिद्द, शिस्त आणि सांघिक खेळाच्या बळावर जगात स्वतःचे स्थान निर्माण करता येते, हे केप वर्देने सिद्ध करून दाखवले.

एका बाजूला केप वर्देसारखा छोटा देश जागतिक फुटबॉलमध्ये उल्लेखनीय कामगिरी करतो, तर दुसऱ्या बाजूला तब्बल १४५ कोटी लोकसंख्या असलेला भारत अजूनही विश्वचषकापासून दूर आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या देशाला जागतिक फुटबॉलमध्ये ठोस स्थान निर्माण करता आलेले नाही, ही निश्चितच चिंतेची बाब आहे. प्रतिभेची कमतरता नसतानाही नियोजन, पायाभूत सुविधा, प्रशिक्षण व्यवस्था आणि तळागाळातील विकास यामध्ये आपण मागे पडत आहोत.

भारतात क्रिकेटला मिळणारी लोकप्रियता आणि सुविधा इतर खेळांना मिळत नाहीत, हे वास्तव आहे. फुटबॉलची परंपरा पश्चिम बंगाल, केरळ, गोवा आणि ईशान्येकडील काही राज्यांपुरतीच मर्यादित राहिली आहे. अनेक ठिकाणी दर्जेदार मैदाने, प्रशिक्षक, प्रशिक्षण केंद्रे आणि स्पर्धांचा अभाव आहे. त्यामुळे अनेक गुणवान खेळाडूंना स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची संधीच मिळत नाही.



भारतात फुटबॉल संस्कृती रुजवायची असेल तर केवळ व्यावसायिक लीग पुरेशा ठरणार नाहीत. शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर फुटबॉलला प्रोत्साहन देणे, प्रत्येक जिल्ह्यात दर्जेदार मैदाने उभारणे, प्रशिक्षित प्रशिक्षक उपलब्ध करून देणे, नियमित स्पर्धांचे आयोजन करणे आणि ग्रामीण भागातील प्रतिभेला योग्य व्यासपीठ मिळवून देणे आवश्यक आहे. माध्यमांनीही फुटबॉलला अधिक प्रसिद्धी दिल्यास आणि आंतरराष्ट्रीय सामन्यांचे व्यापक प्रक्षेपण झाल्यास तरुण पिढी या खेळाकडे अधिक आकर्षित होईल.

भारताकडे प्रतिभा, युवा शक्ती आणि संसाधनांची कमतरता नाही. गरज आहे ती दीर्घकालीन नियोजनाची, सातत्यपूर्ण गुंतवणुकीची आणि फुटबॉलला लोकचळवळीचे स्वरूप देण्याची. क्रिकेटप्रमाणेच फुटबॉललाही देशभरात पोषक वातावरण निर्माण झाले, तर भारताचाही तिरंगा एक दिवस फिफा विश्वचषकाच्या मैदानावर अभिमानाने फडकताना पाहण्याचे स्वप्न निश्चितच साकार होऊ शकते.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# हडको वाघाळा येथील जलशुद्धीकरण केंद्र दुरुस्ती करण्यास सुरुवात



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड मनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालयांतर्गत हडको वाघाळा जलशुद्धीकरण केंद्र दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी एका निवेदनाद्वारे करण्यात आली होती. या मागणीची दखल घेऊन हडको वाघाळा येथील जलशुद्धीकरण केंद्र दुरुस्तीच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. हे काम वेळेत पूर्ण करण्यात येईल, असे मनपा प्रशासनाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

हडको-वाघाळा परिसरातील जल-शुद्धीकरण केंद्रातील गाळ काढण्याच्या कामाला नुकतीच सुरुवात झाली आहे. हे काम वेळेत पूर्ण नाही केल्यास १० जुलै २०२६ रोजी मनपा कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते ॲड. प्रसेनजीत वाघमारे यांनी आयुक्त मनपा व पाणीपुरवठा अभियंता यांना दिला आहे. या निवेदनाची दखल घेऊन संबंधितांनी जलशुद्धीकरण केंद्राच्या दुरूस्तीची कामे व गाळ काढण्यास सुरुवात केली आहे.

हडको येथील पाणी जलशुद्धीकरण केंद्र येथे गेल्या अनेक वर्षांपासून गाळ व घाणीचे साम्राज्य पसरले असून, दुर्गंधीयुक्त पाण्याचा परिसरात होणारा पाणीपुरवठा थांबविण्यात यावा आणि केंद्र परिसरात स्वच्छ व गाळमुक्त पाणी पुरवठा करावा अन्यथा धरणे आंदोलन करण्यात इशारा निवेदनाद्वारे दिला आहे..

सिडको वाघाळा जलशुद्धीकरण केंद्र येथील वॉटर ट्रिटमेंट प्लांट हे जुने व मोडकळीस असल्यामुळे ते सुधारण्यासाठी अमृत २.० या योजनेत घेण्यात आले आहे. गाळ काढणे, फिल्टर वेग व फिल्टर वॉल यासारख्या यंत्रणेची दुरूस्ती करण्याविषयी मनपा प्रशासनाने तातडीने कार्यवाही सुरू केली आहे. संबंधित गुतेदाराला जलशुद्धीकरण केंद्र पाहणी करून दुरूस्ती कामे प्रभावीपणे व वेळेत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# 'यूपीएससी'तील यशाबद्दल आनंद शिंदे यांचा सत्कार



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –धनेगाव येथील ग्रामस्थ दिगांबर शिंदे यांचे चिरंजीव आनंद शिंदे यांनी महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल ग्रामपंचायत कार्यालय धनेगाव-मुझामपेठच्या वतीने माजी सरपंच तथा प्रशासक गंगाधर शिंदे व ग्रामपंचायत सदस्य यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

२ जुलै रोजी ग्रामपंचायत कार्यालय धनेगाव-मुझामपेठ येथे गावातील गुणवंत विद्यार्थी आनंद दिगंबर शिंदे यांनी महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या अभियंता परीक्षेत राज्यात १२ वा क्रमांक मिळविला. त्यामुळे त्यांची राजपत्रित अधिकारी म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला होता.

यावेळी माजी सरपंच तथा प्रशासक गंगाधर शिंदे, ग्रामपंचायत अधिकारी विठ्ठल सूर्यवंशी व नितीन शिंदे, भुजंगराव भालके, डॉ. प्रकाश शिंदे, तातेराव ढवळे, शेख फारूक अब्दुल गफूर, रमेश वाघमारे, अब्दुल गफूर, शिवाजी बुचडे, रफी अहमद ग्रामपंचायत कर्मचारी शेख मुख्तार फारूक, प्रदीप कांबळे, अजित देशमुख, संजय देशमुख यांच्यासह गावातील इनागरिक व मित्र परिवार उपस्थित होता.

# लोहा शहरातील दुकानदारांना कचराकुंड्या वाटप



**लोहा (प्रतिनिधी)** –लोहा शहर स्वच्छ व सुंदर शहर मोहिमेला बळकटी देण्यासाठी महाराष्ट्र ग्रामीण बँकेतील असिस्टंट मॅनेजर तथा लोह्याचे भूमिपुत्र अमोल बालाजी चव्हाण यांनी पुढाकार घेतला आहे. मुख्य बाजारपेठेत दुकानासमोर कचरा संकलन करण्यासाठी वाढदिवसाचे औचित्य साधून ४५० कचरा कुंड्यांचे त्यांनी वाटप केले. तसेच जुन्या शहरात ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी आसन व्यवस्था केली.

शनिवार, दि. ४ जुलै रोजी नगराध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या कचराकुंडी वाटप सोहळ्याचे उद्घाटन स्वारातीम विद्यापीठाचे सिनेट सदस्य नवनाथ चव्हाण यांच्या हस्ते पार पडले. यावेळी ज्येष्ठ नेते केरबाजी बिडवई, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, उपगराध्यक्ष करीम शेख, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, माजी उपनगराध्यक्ष छत्रपती धुतमल, गटनेते भास्कर पवार, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, शिवसेना उबाठाचे तालुकाप्रमुख भीमराव पाटील शिंदे, माजी नगरसेवक संभाजी चव्हाण, नगरसेवक श्याम पवार, गणेश बगाडे, सुधाकर पाटील, तुकाराम दाढेल, पंकज परिहार, सतीश निखाते, विलास कहाळेकर, सचिन मुकदम, सदा तेलंग, नारायण यल्लरवाड, मारुती जंगले, अविनाश पवार, सिकंदर शेख, श्रीकांत मंजलवाड, राजेश बोडके, इरबा पवार, शंकर वट्टमवार, मॅनेजर बाहेती यांच्यासह मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

शहरातील मुख्य रस्त्यावरील व्यापारी दुकानदार, हातगाडेवाले यांना कचराकुंडी देण्यात आली. नगराध्यक्ष शरद पवार व सहकाऱ्यांच्या स्वच्छ व सुंदर शहर मोहिमेला मोठी गती मिळाली आहे. अमोल चव्हाण यांच्या उपक्रमाचे नगराध्यक्ष पवार यांनी कौतुक केले. वृक्षारोपणासाठी लोखंडी जाळ्या देण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी उद्घाटक युवा नेते नवनाथ चव्हाण यांनी अमोल चव्हाण यांच्या सामाजिक बांधीलकीचा आवर्जून उल्लेख करत त्यांच्या कामाची प्रसंशा केली. महेश चव्हाण, साई चव्हाण, प्रशांत शिंदे, संदीप पांचाळ, सूर्यकांत जामगे, मुकुल पवार, रमेश पवार, गजानन दांगटे व मित्रपरिवारांनी या उपक्रमासाठी परिश्रम घेतले. शहरातील शाळांनाही भेट देऊन अमोल चव्हाण यांनी कचराकुंडी दिल्या. यावेळी मुख्याध्यापक व शिक्षकांनी त्यांचे अभीष्टचिंतन केले.




**नांदेड** – सेवानिवृत्त अप्पर पोलीस महासंचालक स्व. डॉ. रामचंद्र थावराजी राठोड यांच्या तैलचित्राचा अनावरण सोहळा कासारखेडा येथील ग्रामस्थांच्या वतीने नुकताच पार पडला. यावेळी डॉ. क्रांती राठोड, डॉ. मनोज राठोड, शशी भारती, बाबुराव शिंदे, बालाजीराव शिंदे, व्यंकटराव शिंदे, रायभान शिंदे, चंद्रशेखर शिंदे, रावसाहेब कडेकर, गोपाळराव आढाव, गजानन शिंदे, मुंजाजीराव बाराते, हिंगोले, गोविंदराव हिंगोले, भीमराव सातोरे, भीमा हिंगोले, चांदराव बाराते, मुख्याध्यापक गंगासागरे, कल्याणकर यांच्यासह शिक्षकवृंदांची उपस्थिती होती. **(छायाचित्र : सचिन डोंगळीकर)**

**पान १ वरून...**

**भारतीय नौदलाच्या ताफ्यात..**

३० एप्रिल २०१९ रोजी तिची ऑर्डर देण्यात आली होती, तर ३० नोव्हेंबर २०२३ रोजी जलावतरण झाले. ३१ मार्च २०२६ रोजी ही नौका भारतीय नौदलाकडे सुपूर्द करण्यात आली. ८० मीटर लांब, ११.३६ मीटर रुंद आणि ११०० टन वजनाची ही नौका ट्रिपल जेट वॉटर प्रणालीमुळे २५ नॉट्स वेगाने धावू शकते. आधुनिक रडार, हल-माउंटेड सेन्सर्स, हलक्या वजनाचे टॉर्पेडो आणि पाणबुडीविरोधी रॉकेट्स ही तिची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

**मुंबईसह राज्यात पावसाचा..**

केला आहे. परंतु प्रकल्पाला होणारा विलंब टाळण्यासाठी तातडीने काम सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. अतिमुसळधार पावसामुळे सखल भागात पाणी साचल्याने अनेक मार्ग बंद झाले होते. ज्यात अंधेरीमध्ये अंधेरी सब वे, वीरा देसाई मार्ग आणि स्वामी विवेकानंद मार्ग बंद झाले होते.

# रामतीर्थ येथे 'एसआयआर' मोहिमेला प्रारंभ



**शंकरनगर (प्रतिनिधी)** – भारत निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षण २०२६ मोहिमेला बिलोली तालुक्यातील रामतीर्थ येथे उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांच्या उपस्थितीत प्रारंभ करण्यात आला. यावेळी त्यांनी नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधत मतदार यादी पुनरीक्षणाबाबत सविस्तर माहिती दिली.

सध्या राज्यभर 'एसआयआर' मोहिमेची अंमलबजावणी सुरू असून, प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे आवश्यक आहे. ज्या नागरिकांचे नाव 'एसआयआर' प्रक्रियेत समाविष्ट होणार नाही किंवा आवश्यक माहिती सादर केली जाणार नाही, त्यांचे नाव नियमानुसार मतदार यादीतून वगळले जाऊ शकते, अशी माहिती यावेळी देण्यात आली. नागरिकांनी २००२ च्या मतदार यादीत आपले नाव आहे की नाही, याची खात्री करून घ्यावी. तसेच कुटुंबातील नवीन पात्र सदस्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहनही करण्यात आले.

मोहिमेंतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घराघरांत जाऊन गणना फॉर्मचे वितरण व माहिती संकलन करण्यात येणार आहे. ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारल्या जातील. त्यावरील सुनावणीनंतर ३ ऑक्टोबर पर्यंत निर्णय घेण्यात येणार असून, ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रकाशित करण्यात येईल.

मॅपिंग न झालेल्या मतदारांनी गणना फॉर्मसह आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. यासाठी जन्म दाखला, पासपोर्ट, दहावीचे शैक्षणिक प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, शासकीय किंवा सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचारी अथवा निवृत्तीवेतन प्रमाणपत्र, शासनाने दिलेले जमीन किंवा वनपट्टा, घरवाटप प्रमाणपत्र, वनहक्क प्रमाणपत्र आदी कागदपत्रे ग्राह्य धरली जाणार असल्याची माहिती देण्यात आली.

यावेळी मंडळ अधिकारी कल्पना मुंडकर, रामतीर्थ सजाचे तलाठी विजय जाधव, ग्रामपंचायत अधिकारी श्रीपाद जाधव, सरपंच प्रतिनिधी राजेंद्र तोडे, उपसरपंच प्रतिनिधी मुरलीधर देगलूर, रामराव पाटील रोकडे, उद्धव रोकडे, महसूल सेवक ओमकार पंधरवाडे, भानुदास वाघमारे, भारतबाई वाघमारे, कलावतीबाई राठोड, जयशीला सोनकांबळे, पौर्णिमा भंडारे, शोभाबाई वाघमारे, तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# खरीप हंगाम विमा योजनेत सहभागी आवाहन



**मुदखेड (प्रतिनिधी)** – कर्जदार व बिगर कर्जदार शेतकरी योजनेमध्ये सहभाग घेऊ शकतात. मुदखेड तालुक्यातील मुदखेड, बारड व मुगट या तीनही अधिसूचित महसूल मंडळातील शेतकऱ्यांनी प्रतिहेक्टरी नऊ हजार रूपये शेतकरी हिस्सा प्रमाणे विमा हप्ता भरून योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी डॉ. अमरज्योती गच्चे यांनी केले आहे.

हवामान धोके व कालावधीनुसार विमा संरक्षित रक्कम भारतीय कृषी विमा कंपनी मार्फत देय होणार आहे. पावसाचा खंड १५ जून ते ३१ जुलै या दरम्यान सलग पंधरा दिवस राहिल्यास नुकसान भरपाई रुपये सत्तावीस हजार देय आहे. १ ऑगस्ट ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत सलग तीस दिवस ५० मि.मी. पेक्षा कमी पाऊस झाल्यास छत्तीस हजार रुपये नुकसान भरपाई देय आहे. एक नोव्हेंबर ते २८ फेब्रुवारी या कालावधीमध्ये सलग पाच दिवस अवेळी एकूण ५० मिमी अथवा त्यापेक्षा जास्त पाऊस राहिल्यास ९० हजार रुपये नुकसान भरपाई देय आहे. १ नोव्हेंबर ते २८ फेब्रुवारी या कालावधीमध्ये सलग ३० दिवस ३० डिग्री सेल्सिअस किंवा त्यापेक्षा जास्त तापमान राहिल्यास सत्तावीस हजार रुपये नुकसान भरपाई देय आहे. एकूण एक लाख ऐंशी हजार रुपये विमा संरक्षित रक्कम देय आहे. तरी हळद फळपिक विमा योजनेत सहभागी होण्याचा अंतिम दि. १४ जुलै २०२६ असून, त्यापूर्वी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेला धनेगाव येथे प्रतिसाद



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड तालुक्यातील धनेगाव येथे पुनरीक्षण मोहिमेला नुकतीच सुरुवात करण्यात आली आहे. या मोहिमेला नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अधिपत्याखाली उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांच्या आदेशानुसार धनेगाव-मुझामपेठ ग्रामपंचायत कार्यालयांतर्गत बीएलओ व ग्रामविकास अधिकारी व्ही. पी. सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत सदस्य रफी अहेमद यांनी अलमेराज गेस्ट हाऊस येथे आयोजित केलेल्या मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेला ४ जुलै रोजी या भागातील महिला, पुरूष व युवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेला १ जुलै रोजी सुरूवात करण्यात आल्यानंतर ग्रामपंचायत सदस्य रफी अहेमद यांनी पुढाकार घेऊन अलमेराज गेस्ट हाऊस येथे मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गटविकास अधिकारी सुरडकर यांच्या उपस्थितीत ग्रामसेवक व्ही.पी. सूर्यवंशी, विस्तार अधिकारी कांबळे, सुपरवायझर शिंदे व बीएलओ यांनी मोहिमेत गणना पत्र भरून घेतले. यावेळी धनेगाव परिसरातील महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बसपाच्या प्रभारीपदी निर्मला वाघमारे तर विधानसभा अध्यक्षपदी छाया गायकवाड




**नांदेड (प्रतिनिधी)**– बहुजन समाज पार्टीच्या नांदेड जिल्हा महिला प्रभारीपदी सौ. निर्मला वाघमारे यांची तर नांदेड उत्तर महिला विधानसभा अध्यक्षपदी सौ. छाया गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे.

बीएसपी भवन, गणेश नगर, नांदेड येथील कार्यालयात बहुजन समाज पक्षाच्या नांदेड जिल्हा कार्यकारिणीची विशेष बैठक घेण्यात आली, या बैठकीत विविध पदांच्या निवडीची घोषणा जिल्हाध्यक्ष सुभाष भोकरे आणि महिला जिल्हाध्यक्षा मायाताई पाटील यांनी केली.

सौ. निर्मला वाघमारे आणि सौ. छाया गायकवाड ह्या मागील अनेक वर्षांपासून बहुजन समाज पक्षात सक्रीय कार्य करीत आहेत. त्यांचा चांगला जनसंपर्क असून, त्यांचा पक्षाला चांगलाच फायदा होणार आहे. बुथ व सेक्टर स्तरावर पक्षाची बांधणी करण्याचा संकल्प त्यांनी केला असल्याचे पक्षातील वरिष्ठांनी सांगितले.

बहुजन समाज पक्षाचे मराठवाडा झोन प्रभारी मनिष कावळे, राज्य कार्यकारिणी सदस्य इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर, जिल्हा प्रभारी शिवाजी सोनटक्के, लोकेश कांबळे, धम्मपाल गच्चे, सटवा सोनकांबळे, जयवंत थोरात, जिल्हा महासचिव सुधाकर सरोदे, जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल कोठेवाड आदींनी नवनिर्वाचित महिला पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

बसपाचे जिल्हाध्यक्ष सुभाष भोकरे यांच्या कुशल नेतृत्वाखाली ४ जुलैपासून २० जुलैपर्यंत विधानसभा-निहाय झंझावती दौऱ्यांचे आयोजन करण्यात आले आहे. बहुजन समाज पार्टी बळकट करण्यासाठी पक्ष स्तरावर प्रयत्न सुरू आहेत.

# अवनी करंदीकर यांना चेन्नई येथे गुणवत्ता प्रमाणपत्र प्रदान



**नांदेड (प्रतिनिधी)** – येथील गोदावरी अर्बनचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांच्या कन्येने 'लाईफ कोचिंग'मध्ये गुणवत्ता प्रमाणपत्र मिळवून यशाचे नवे शिखर गाठले. हा क्षण तांबेकर-करंदीकर कुटुंबियांसाठी अविस्मरणीय ठरला आहे.

धनंजय तांबेकर यांची कन्या आणि 'द हिडन पॉवर ऑफ मॅरिड वूमन'या पुस्तकाच्या लेखिका अवनी अथर्व करंदीकर (देवयानी) यांनी चेन्नई येथे 'लाईफ कोचिंग'मध्ये गुणवत्ता प्रमाणपत्र (मेरिट सर्टिफिकेट) पटकावून यशाचे नवे शिखर गाठले आहे. अवनी करंदीकर यांना हे सन्मानचिन्ह भारतातील अग्रगण्य लाईफ कोच, मोटिव्हेशनल स्पीकर आणि 'लाईफ बाय डिझाईन'च्या संस्थापक पूजा पुनीत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. प्रतिभावान मार्गदर्शकाच्या हस्ते मिळालेला हा बहुमान अवनीच्या जीवनप्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करतानाच, इतरांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणण्याची तिची जिद्द आज खऱ्या अर्थाने फळाला आली आहे, असे कौतुक सर्वस्तरातून होत आहे.

लेकीच्या या यशाने भारावलेले वडील धनंजय तांबेकर यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले की, 'अवनीची मेहनत, शिस्त आणि इतरांना मदत करण्याची वृत्ती आम्हा सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. यश हे अंतिम ध्येय नसून, ती अधिक जबाबदाऱ्या आणि निरंतर शिकण्याची एक सुरुवात आहे.'

अवनीने यापुढील काळातही ज्ञानाच्या जोरावर समाजात एक वेगळी ओळख निर्माण करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# गरुडा अकॅडमीच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –येथील गरुडा अकॅडमीच्या स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा उत्साहात सत्तकार करण्यात आला.

गरुडा अकॅडमीच्यावतीने स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य असे विनामूल्य मार्गदर्शन करण्यात आले. त्यांच्या या मार्गदर्शनामुळे पोलीस दलासह विविध खात्यात अनेक विद्यार्थी यशस्वी झाले. या यशस्वी विद्यार्थ्यांचा गरुडा अकॅडमीच्यावतीने सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना माजी उपमहापौर तथा शिवसेना दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांनी पोलीस भरतीसाठी प्रयत्न करणाऱ्या परिसरातील युवकांना लवकरच मैदान उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन गरूडा अकॅडमीच्या आयोजित सत्कार सोहळ्यात दिले.

गरूडा अकॅडमी सिडकोच्यावतीने पोलीस भरतीसह विविध पदांवर कार्यरत असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांसह त्यांच्या आई-वडिलांचा सत्कार सोहळा व सेवानिवृत्त उपनिरीक्षक नागोराव पोले यांचा सत्कार केला.

या सोहळ्याला माजी उपमहापौर तथा शिवसेनेचे दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे, व्हाईस मीडियाचे जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश जोशी, सामाजिक कार्यकर्ते अवतारसिंग सोडी, डॉ. रमेश नांदेडकर, गोपाळ चावडीचे उपसरपंच साहेबराव सेलूकर, नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, नगरसेवक प्रतिनिधी उदय देशमुख, सतीश बसवदे, गिरीधर मैड, नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष रमेश ठाकूर, दलितमित्र नारायण कोलंबीकर, पोलीस अमलदार रामदयाल ठाकूर यांच्यासह सेवानिवृत्त उपनिरीक्षक नागोराव पोले यांची उपस्थिती होती.

गरूडा अकॅडमी सिडकोच्या पोलीस भरतीमध्ये अक्षय जोगदंड मुंबई लोहमार्ग पोलीस, उज्ज्वल ढवळे नांदेड पोलीस, पुनम पवार मुंबई पोलीस, सिध्दोधन शिंदे सीआरपीएफ, संजना जाधव आसाम रायफल, शिवम जामगे इंडियन आर्मी, भीमाशंकर मठपती नांदेड पोलीस, सोहन शेख यवतमाळ पोलीस, मनोज मिसाळे एसआरपीएफ हिंगोली, महेश तोटवाड मुंबई पोलीस, ज्ञानेश्वर कुडदूले एसारपीएफ गडचिरोली, गजानन इटलवाड नार्को टेक्स हवालदार, विजय वाडे विद्युत सहायक हे विद्यार्थी यशस्वी ठरले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल यांच्यासह त्यांच्या आई, वडिलांचा व ३६ वर्षे सेवा करून सेवानिवृत्त झालेले कुंटूर पोलीस स्टेशन येथील उपनिरीक्षक नागोराव पोले यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिगांबर शिंदे यांनी केले. तर कार्यक्रमाचे आयोजन संयोजक तथा गरूडा अकॅडमी सिडकोचे संचालक सुशांत पोले यांनी केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी वैभव कोकरे, सुदर्शन एडके, राज काळे, गजानन शिरसे, संग्राम शिंदे, सागर भोळे यांनी सहकार्य केले.

# प्रगतीमंत्र




# पदवीधरांसाठी सुवर्णसंधी!

## सीए घडवणाऱ्या ICAI मध्ये 129 पदांची भरती; वार्षिक वेतन 7.45 लाखांपर्यंत

**नोकरीच्या शोधात असलेल्या उमेदवारांसाठी आनंदाची बातमी आहे. देशातील चार्टर्ड अकाउंटंट (सीए) अभ्यासक्रम आणि परीक्षा आयोजित करणाऱ्या इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICAI) ने ब्रँच इनचार्ज पदांसाठी भरती जाहीर केली आहे. या भरतीसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून इच्छुक उमेदवारांनी १९ जुलै २०२६ पर्यंत अर्ज करावा. ICAI ही देशभरात सीए अभ्यासक्रम, परीक्षा, इन्स्टिट्यूट आर्टिकलशिप आणि सदस्यत्वाचे व्यवस्थापन करणारी प्रमुख संस्था आहे. संस्थेच्या विविध प्रादेशिक परिषदांमधील शाखांसाठी एकूण १२९ रिक्त पदे भरली जाणार आहेत. विशेष म्हणजे, कोणत्याही शाखेतील पदवीधर या भरतीसाठी अर्ज करू शकतात.**

### अर्ज कसा कराल?

- ICAI च्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्या.
- Career विभागात जाऊन Branch Incharge Recruitment 2026 ही जाहिरात उघडा.
- नवीन उमेदवारांनी प्रथम नोंदणी (Registration) करावी.
- त्यानंतर लॉग-इन करून वैयक्तिक माहिती, शैक्षणिक पात्रता आणि कामाचा अनुभव भरावा.
- आवश्यक कागदपत्रे व छायाचित्र अपलोड करावे.
- २५० अर्ज शुल्क ऑनलाइन भरून अर्ज अंतिम स्वरूपात सादर करावा.

- शैक्षणिक पात्रता : मान्यताप्राप्त विद्यापीठातून कोणत्याही शाखेतील पदवी आवश्यक. त्यामुळे सामान्य पदवीधर उमेदवारही अर्ज करण्यास पात्र आहेत.
- वयोमर्यादा : अर्जदाराचे वय २७ ते ४० वर्षे असावे. वयोमर्यादेची गणना ३० जून २०२६ या तारखेच्या आधारावर केली जाईल.

### निवड प्रक्रिया

**भरतीसाठी उमेदवारांची निवड दोन टप्प्यांत केली जाईल.**

**संगणक आधारित परीक्षा (CBT)**

- परीक्षा ४२५ गुणांची असेल.
- कालावधी १८० मिनिटे.
- वस्तुनिष्ठ आणि वर्णनात्मक स्वरूपाचे प्रश्न विचारले जातील.
- इंग्रजी आकलन, ई-मेल लेखन, एमएस एक्सेल, एमएस वर्ड, सामान्य ज्ञान आणि मूलभूत लेखाशास्त्र या विषयांचा समावेश असेल.

**मुलाखत**

- **मुलाखतीत किमान ३० गुण मिळवणे आवश्यक आहे.**
- **CBT आणि मुलाखतीतील गुणांच्या आधारे अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल.**

## कधीकाळी मुंबईच्या झोपडपट्टीत राहत होता, आजघडीला जर्मनीतील अपार्टमेंटचा मालक...

# भारताच्या पहिल्या GitHub Star संतोष यादव यांची प्रेरणादायी कहाणी...

**यशाच्या शिखरावर पोहोचलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यामागे संघर्षाची मोठी कहाणी दडलेली असते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून जिद्द, मेहनत आणि शिक्षणाच्या बळावर स्वतःचे भविष्य घडविणाऱ्या व्यक्तींमध्ये भारतीय वंशाचे सॉफ्टवेअर अभियंता संतोष यादव यांचे नाव आवर्जून घेतले जाते. मुंबईतील झोपडपट्टीत बालपण गेलेला हा युवक आज जर्मनीत स्थायिक झाला असून बहुमजली अपार्टमेंटचा मालक आहे. भारताचे पहिले GitHub Star म्हणूनही त्यांची ओळख आहे.**

संतोष यादव यांनी नुकतेच सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर पत्नी उपासना यांच्यासोबतचे दोन छायाचित्रे शेअर केली. एक छायाचित्र २०१२ मधील मुंबईतील त्यांच्या साध्या घरातील, तर दुसरे २०२६ मधील जर्मनीतील हॅम्बुर्ग येथील आहे. या दोन्ही छायाचित्रांमधून गेल्या १४ वर्षांतील त्यांच्या आयुष्यात झालेला मोठा बदल पाहून अनेकांनी त्यांच्या संघर्षाला सलाम केला.



### झोपडपट्टीतील बालपण

संतोष यादव यांचा जन्म मुंबईत झाला. बालपण झोपडपट्टीतच गेले. चित्रपटांत दाखवल्या जाणाऱ्या झोपडपट्टीसारखेच वातावरण असल्याचे त्यांनी सांगितले आहे. त्या परिसरात चांगली माणसेही होती आणि वाईट प्रवृत्तीचीही. मात्र चुकीच्या मार्गावर न जाता शिक्षणाची वाट निवडणे हेच त्यांच्या आयुष्यातील पहिले मोठे यश ठरले. शालेय जीवनात क्रिकेट हे त्यांचे पहिले प्रेम होते. अभ्यासाकडे फारसे लक्ष नसल्याने दहावीच्या परीक्षेत अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाले. विज्ञान शाखेत प्रवेश मिळाला नाही. वडिलांच्या मित्राच्या सल्ल्याने त्यांनी कॉम्प्युटर सायन्स डिप्लोमा अभ्यासक्रमात प्रवेश घेतला. विशेष म्हणजे त्याआधी त्यांनी कधी संगणक वापरलेलाही नव्हता. हिंदी माध्यमातून शिक्षण झाल्यामुळे इंग्रजी विषय त्यांच्यासाठी मोठे आव्हान होते. वर्गात शिक्षकांचे बोलणे समजत नसल्याने एकदा त्यांना रडूही आले होते. मात्र त्यांनी हार न मानता अभ्यासावर पूर्ण लक्ष केंद्रित केले. परीक्षांमध्ये अपेक्षित यश न मिळाल्यानंतर त्यांनी क्रिकेट खेळणे बंद केले, मित्रांपासून काही काळ दूर राहिले आणि अभ्यासावर लक्ष केंद्रित केले. पहिल्या वर्षात सुमारे ५० टक्के गुण मिळविल्यानंतर त्यांनी सातत्य राखले आणि अंतिम वर्षात ६० टक्क्यांहून अधिक गुण मिळवले.

- आर्थिक संकटाचा सामना : कॉम्प्युटर सायन्स पदवीचे शिक्षण सुरू असतानाच त्यांच्या वडिलांची नोकरी गेली. वार्षिक सुमारे ४२ हजार रुपयांची फी भरणे शक्य नसल्याने शिक्षण अर्धवट सोडण्याची वेळ आली होती. मात्र त्यांच्या आईने ठामपणे शिक्षण सुरू ठेवण्याचा आग्रह धरला. पाठ्यपुस्तके खरेदी करण्याचीही आर्थिक क्षमता नसल्याने ते ग्रंथालयातील पुस्तके वापरत होते. काही प्राध्यापकांनी स्वतः पुस्तके उधार घेऊन त्यांना अभ्यासासाठी दिली. अखेर त्यांनी पदवीचे शिक्षण पूर्ण केले.
- ५ हजार रुपयांच्या नोकरीपासून सुरुवात : २००७ मध्ये संतोष यादव यांनी उपासना यांच्याशी विवाह केला. आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. पावसाळ्यात घरात पाणी गळत असे. अशा परिस्थितीत त्यांनी ५ हजार रुपये मासिक वेतनावर पहिली नोकरी स्वीकारली. २०१० मध्ये C# वापरून विंडोज ॲप्लिकेशन विकसित करणाऱ्या कंपनीत १२ हजार रुपयांच्या पगारावर दुसरी नोकरी मिळाली. मोकळ्या वेळात त्यांनी C# आणि SQL या तंत्रज्ञानात प्रावीण्य मिळवले. २०११ मध्ये ते एका स्टार्टअपमध्ये दाखल झाले. तेथे पाच वर्षे काम करताना त्यांना विमा, भविष्यनिर्वाह निधी आणि अधिक चांगल्या संधी मिळाल्या.
- GitHub Star होण्यापर्यंतचा प्रवास : कोडिंग कौशल्य सातत्याने विकसित करत त्यांनी Angular आणि NgRx या तंत्रज्ञानात विशेष प्रावीण्य मिळवले. २०१९ मध्ये त्यांना Google Developer Expert म्हणून मान्यता मिळाली. त्यानंतर २०२० मध्ये ते भारताचे पहिले GitHub Star ठरले. या काळात मुलीच्या आपत्कालीन उपचारांचा खर्च, शाळेचा प्रवेश, क्षयरोगाच्या उपचारासाठी घेतलेले कर्ज अशा अनेक अडचणींचा सामना त्यांनी केला. तरीही त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा सोडली नाही.



### जर्मनीत नवी वाटचाल

वयाच्या ३६व्या वर्षी संतोष यादव यांनी जर्मनीत जाण्याचा निर्णय घेतला. त्याआधी पत्नी आणि मुलीसह ते मुंबईतील झोपडपट्टीत राहत होते. सध्या ते CodeRabbit या कंपनीत Principal Developer Advocate म्हणून कार्यरत असून कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित डेव्हलपर टूल्सवर काम करत आहेत. लग्नाच्या १७व्या वाढदिवसानिमित्त त्यांनी सोशल मीडियावर आपल्या आयुष्यातील प्रवासाची झलक शेअर केली. एका ब्लॉगमध्ये त्यांनी लिहिले आहे, 'एक काळ असा होता की आम्ही जमिनीवर झोपत होतो. त्या दिवसांची आठवण आजही मला अधिक धैर्य देते. त्या वेळी आमच्याकडे काहीच नव्हते; पण मदत करणारी माणसे होती. आता इतरांना मदत करण्याची वेळ आमची आहे.' संतोष यादव यांची कहाणी ही प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षण, चिकाटी आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर आयुष्य बदलता येते, याचे प्रेरणादायी उदाहरण मानली जाते.

# पाचवीत नापास, UPSC मध्ये तीनदा अपयश; धाकट्या भावामुळे 24 व्या वर्षी नेहा बनली आयएएस!

**जिद्द, सातत्य आणि कुटुंबाचा भक्कम पाठिंबा असेल तर अपयशही यशाचा मार्ग मोकळा करू शकते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे आयएएस अधिकारी नेहा ब्याडवाल. सलग तीन वेळा केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) नागरी सेवा परीक्षेत अपयश आल्यावरही त्यांनी हार मानली नाही. चौथ्या प्रयत्नात त्यांनी 2021 च्या UPSC परीक्षेत अखिल भारतीय 569 वा क्रमांक मिळवत अवघ्या 24 व्या वर्षी आयएएस अधिकारी होण्याचे स्वप्न साकार केले.**



- पाचवीत नापास, पण जिद्द कायम : नेहा यांचा जन्म राजस्थानातील जयपूर येथे झाला. मात्र वडील श्रवण कुमार हे आयकर विभागात अधिकारी असल्याने त्यांच्या बदली वारंवार होत राहिल्या. त्यामुळे नेहाला छत्तीसगड आणि मध्य प्रदेशातील विविध शाळांमध्ये शिक्षण घ्यावे लागले. सतत बदलणारे वातावरण, नवी भाषा आणि नवीन शाळांशी जुळवून घेताना त्यांना अनेक अडचणी आल्या. इतकेच नव्हे, तर त्या पाचवी इयत्तेत नापासही झाल्या. मात्र या अपयशाने त्या खचल्या नाहीत.
- विद्यापीठात प्रथम क्रमांक : रायपूर येथील डीबी गर्ल्स कॉलेजमध्ये शिक्षण घेताना त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवला. त्यानंतर वडिलांच्या प्रेरणेने त्यांनी नागरी सेवा परीक्षेची तयारी सुरू केली. मात्र आयएएस होण्याचा प्रवास सोपा नव्हता. सलग तीन प्रयत्नांत त्यांना अपयशाचा सामना करावा लागला. अपयशाच्या काळात कुटुंबाने त्यांचा आत्मविश्वास ढळू दिला नाही. नेहा सांगतात, 'कठीण काळातच स्वतःला नव्याने ओळखण्याची संधी मिळते. माझ्या कुटुंबाने प्रत्येक टप्प्यावर मला पुढे जाण्याची प्रेरणा दिली.'
- सोशल मीडियापासून दूर, भावाच्या स्टॉपवॉचमुळे बदलली तयारी : वारंवार अपयश आल्यानंतर नेहाने स्वतःमधील उणिवा ओळखून त्यावर काम करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी जवळपास तीन वर्षे सोशल मीडियापासून पूर्णपणे दूर राहून अभ्यासावर लक्ष केंद्रित केले. या काळात धाकट्या भावाने त्यांना मोठी मदत केली. त्याच्या छोट्याशा स्टॉपवॉचच्या मदतीने वेळेच्या मर्यादेत उत्तरलेखनाचा सातत्याने सराव करून घेतला. त्यामुळे दबावाखालीही एकाग्र राहून परीक्षा देण्याची सवय लागली. नेहा म्हणतात, 'मी माझ्या कमतरतांवर मेहनत घेतली आणि माझ्या ताकदीला अधिक बळ दिले. माझा धाकटा भाऊ माझा खरा साथीदार ठरला. त्याच्या स्टॉपवॉचमुळे वेळेचे नियोजन आणि दबावाखाली काम करण्याची कला शिकले.'
- निकालाच्या दिवशी अश्रू अनावर : चौथ्या प्रयत्नात यश मिळाल्यानंतरचा क्षण आठवत नेहा भावूक होतात. त्या सांगतात, '24 व्या वर्षी माझे स्वप्न पूर्ण झाले. निकालाच्या दिवशी बाहेरून मी शांत होते, पण मनातून खूप रडत होते. माझ्या कुटुंबाच्या डोळ्यांतील आनंद पाहून सर्व कष्टांचे चीज झाल्याची भावना झाली.'

# अमेरिकेत शिक्षणासाठी भारतीय विद्यार्थ्यांना लाखोंची शिष्यवृत्ती; निबंध किंवा व्हिडिओद्वारे अर्जाची संधी!

**अमेरिकेत उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. युनिव्हर्सिटी ऑफ आयडाहो (University of Idaho) ने आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी दोन विशेष शिष्यवृत्ती योजनांची घोषणा केली आहे. या शिष्यवृत्तीमुळे शिक्षण शुल्काचा मोठा भार कमी होण्यास मदत होणार आहे. विशेष म्हणजे, यापैकी एका शिष्यवृत्तीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याचीही आवश्यकता नाही.**

- **युनिव्हर्सिटी ऑफ आयडाहोच्या दोन विशेष शिष्यवृत्ती योजना जाहीर**
- **एका शिष्यवृत्तीसाठी स्वतंत्र अर्जाची गरज नाही**
- **दुसऱ्यासाठी निबंध किंवा 2 ते 5 मिनिटांचा व्हिडिओ सादर करावा लागणार**

अमेरिकेतील सरकारी विद्यापीठांमध्येही शिक्षण शुल्क वार्षिक सुमारे २५ हजार ते ४५ हजार अमेरिकन डॉलर (अंदाजे २४ ते ४३ लाख रुपये) इतके असते. त्याशिवाय राहण्याचा आणि इतर खर्चही विद्यार्थ्यांना करावा लागतो. ही आर्थिक अडचण लक्षात घेऊन युनिव्हर्सिटी ऑफ आयडाहोने दोन शिष्यवृत्ती योजना सुरू केल्या आहेत.

### Invitation to Idaho शिष्यवृत्ती

ही शिष्यवृत्ती २०२६ च्या फॉल सत्रात प्रथमच युनिव्हर्सिटी ऑफ आयडाहोमध्ये प्रवेश घेणाऱ्या किंवा अन्य संस्थेतून येथे पदवी पूर्ण करण्यासाठी प्रवेश घेणाऱ्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी आहे. या शिष्यवृत्तीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता नाही. पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाल्यानंतर शिष्यवृत्ती आपोआप लागू होते. वार्षिक शिक्षण शुल्क २९,०१६ डॉलरवरून १३,२९४ डॉलरपर्यंत कमी होते. म्हणजेच शिक्षण शुल्कात जवळपास निम्मी बचत होते. या शिष्यवृत्तीसाठी अटी व नियम असून, त्यात फॉल २०२६ सत्रासाठी प्रवेश आवश्यक आहे. ऑनलाइन अभ्यासक्रम किंवा उन्हाळी (Summer Session) अभ्यासक्रमासाठी ही शिष्यवृत्ती लागू नाही. ही शिष्यवृत्ती इतर काही शिष्यवृत्तींशी एकत्र घेता येणार नाही. शिष्यवृत्ती जास्तीत जास्त तीन वर्षांपर्यंत नूतनीकरण करता येईल. त्यासाठी विद्यार्थ्याचा GPA किमान २.५ असणे आवश्यक आहे.

### #YouAreWelcomeHere शिष्यवृत्ती

नेतृत्वगुण असलेल्या आणि विविध संस्कृतींमधील संवाद व समन्वय वाढविण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही विशेष शिष्यवृत्ती आहे. शिष्यवृत्तीत शिक्षण शुल्कावर 50 टक्के सवलत मिळते. ही सवलत कमाल चार वर्षांपर्यंत सुरू राहू शकते. या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करताना खालीलपैकी एक पर्याय निवडावा लागेल. ५०० ते १ हजार शब्दांचा निबंध सादर करणे किंवा २ ते ५ मिनिटांचा व्हिडिओ तयार करून सादर करावा लागणार आहे. यात विद्यार्थ्याने आपल्या नेतृत्वगुणांच्या माध्यमातून विविध संस्कृतींमध्ये संवाद आणि सहकार्य कसे वाढवेल, हे स्पष्ट करणे अपेक्षित आहे. ही शिष्यवृत्ती केवळ पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी आहे. विद्यार्थ्याने अमेरिकेबाहेरील शैक्षणिक संस्थेतून पूर्व शिक्षण पूर्ण केलेले असावे.

### भारतीय विद्यार्थ्यांसाठी संधी

अनेक अमेरिकन विद्यापीठांमध्ये शिष्यवृत्ती मिळविण्याची प्रक्रिया गुंतागुंतीची किंवा अत्यंत स्पर्धात्मक असते. मात्र, युनिव्हर्सिटी ऑफ आयडाहोची ही योजना तुलनेने सोपी आणि पारदर्शक मानली जाते. एकीकडे आपोआप मिळणारी शिष्यवृत्ती शिक्षण शुल्कात मोठी कपात करते, तर दुसरीकडे निबंध किंवा व्हिडिओच्या आधारे मिळणारी शिष्यवृत्ती नेतृत्वगुण आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीला प्रोत्साहन देते. अमेरिकेत शिक्षण घेण्याची इच्छा असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांनी वेळेत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत. तसेच, शिष्यवृत्तीचे नूतनीकरण सुरू राहण्यासाठी आवश्यक शैक्षणिक गुणवत्ता कायम राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे.



# औरंगाबाद जिल्हा बँकेवर महायुतीचा झेंडा; २० पैकी १८ जागांवर वर्चस्व, भूमिपुत्र बचाव पॅनलचा पराभव



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)–** गेल्या महिना-भरापासून चर्चेत असलेल्या औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून महायुतीने बँकेवर वर्चस्व मिळवले आहे. २० संचालक पदांपैकी १८ जागांवर महायुतीच्या उमेदवारांनी विजय मिळवत बँकेची सत्ता आपल्या ताब्यात घेतली.

या निवडणुकीत महाविकास आघाडी समर्थित भूमिपुत्र बचाव पॅनलला मोठा धक्का बसला. या पॅनलमधून काँग्रेसचे खासदार डॉ. कल्याण काळे हे एकमेव उमेदवार विजयी ठरले. यापूर्वी बिनविरोध निवडून आलेले काँग्रेसचे

सकाळी ८ वाजल्यापासून मत-मोजणीला सुरुवात झाली. सुरुवातीपासूनच महा-युतीच्या उमेदवारांना आघाडी मिळत गेली. भाजपचे मंत्री अतुल सावे, शिवसेनेचे मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, आमदार संजना जाधव आणि अनुराधा चव्हाण यांच्यासह अनेक उमेदवार विजयी झाले.

अनिल बोरसे यांनीही महायुतीला पाठिंबा दिल्याने महायुतीची ताकद आणखी वाढली.

या निवडणुकीत २० पैकी ८ संचालक यापूर्वीच बिनविरोध निवडून आले होते. त्यामध्ये ७ उमेदवार महायुतीचे तर एक काँग्रेसचा होता. उर्वरित १२ जागांसाठी ३१ उमेदवार रिंगणात होते. एकूण १०५३ मतदारांपैकी १०४८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदानाची टक्केवारी जवळपास ९९ टक्के इतकी नोंदवली गेली. दरम्यान, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार अंबादास दानवे यांनी महायुतीच्या पॅनलकडून निवडणूक लढवल्याने या निवडणुकीची राज्यभर चर्चा झाली होती. मतदानापूर्वीच महाविकास आघाडीच्या पॅनलमध्ये पडलेल्या फुटीचाही महायुतीला फायदा झाल्याचे निकालातून स्पष्ट झाले.

## केंद्र सरकारकडून कांदा उत्पादकांना दिलासा



**मुंबई(प्रतिनिधी)–**कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळावा, तसेच सरकारच्या 'किंमत स्थिरीकरण राखीव साठ्या'ची क्षमता अधिक मजबूत व्हावी, या हेतूने केंद्र सरकारने सरकारी कांदा खरेदीदरात १३ टक्क्यांची वाढ केली आहे. त्यानुसार, आता कांद्याचा सरकारी खरेदीदर प्रति क्विंटल १ हजार ८७५ रुपयांवरून २ हजार १२५ रुपये करण्यात आला असून, हे सुधारित दर ४ जुलै २०२६ पासून लागू झाले आहेत. सध्या 'नाफेड' आणि 'एनसीसीएफ' या केंद्रीय संस्थांमार्फत राखीव साठ्यासाठी कांदा खरेदीची प्रक्रिया वेगाने राबवली जात आहे.

कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाच्या २०२५-२६ च्या दुसऱ्या आगाऊ अंदाजानुसार, देशात यंदा ३०७.३७ लाख मेट्रिक टन कांदा उत्पादनाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. गेल्या वर्षी (२०२४-२५) हे उत्पादन ३०७.६७ लाख मेट्रिक टन इतके झाले होते. म्हणजेच, यंदाचे उत्पादन हे गेल्या वर्षीच्या उत्पादनाच्या आसपासच राहणार असल्याने देशात कांद्याची उपलब्धता पुरेशी आहे आणि टंचाईची कोणतीही चिंता नाही. मात्र, दरवर्षीप्रमाणे या हंगामात कांद्याचे भाव थोडे वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सध्या महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरातमध्ये कांद्याचा साठा मुबलक असून बाजारात टंचाईची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत.

देशभरातील विविध बाजारपेठांमध्ये मिळून दररोज ५० हजार मेट्रिक टनांपेक्षा जास्त कांद्याची आवक होत आहे. विशेष म्हणजे, यात एकट्या महाराष्ट्रातून ३० हजार मेट्रिक टनांहून अधिक कांदा बाजारात येत आहे. सध्या घाऊक बाजारात कांद्याला सरासरी १८ रुपये प्रति किलोच्या आसपास भाव मिळत आहे, तर देशात कांद्याचा सरासरी किरकोळ दर ३१ रुपये प्रति किलो इतका आहे. सध्या शेतकऱ्यांनी चांगल्या दर्जाचा कांदा साठवणुकीत ठेवला असून, बाजारातील आवक कमी होईल अशा काळात तो विक्रीसाठी आणला जाण्याची शक्यता आहे.


### जाहीर प्रगटन

मा. श्रीमती ए. टी. गित्ते, दिवाणी न्यायाधीश क. स्तर नायगांव यांच्या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज ८७/२०२६

वर्षा सोनकांबळे व इतर ३ विरुद्ध मंजुळाबाई सोनकांबळे

अर्जदार – १. वर्षा भ्र. यशवंत सोनकांबळे वय ४० वर्षे, धंदा घरकाम, २. योगिता पि. यशवंत सोनकांबळे वय : १६ वर्षे, धंदा शिक्षण (अज्ञान) अ.पा.क. वर्षा भ्र. यशवंत सोनकांबळे, ३. सावरी पि. यशवंत सोनकांबळे वय : ११ वर्षे, धंदा-शिक्षण (अज्ञान) अ.पा.क. वर्षा भ्र. यशवंत सोनकांबळे ४. वैभव पि. यशवंत सोनकांबळे वय : ९ वर्षे, धंदा- शिक्षण (अज्ञान) अ.पा.क. वर्षा भ्र. यशवंत सोनकांबळे सर्व रा. शाम नगर नरसी ता. नायगांव खै. जि. नांदेड

विरुध्द

मंजुळाबाई भ्र. भगवान सोनकांबळे, वय: ७७ वर्षे, धंदा-निरंक रा. शाम नगर नरसी, ता. नायगांव खै. जि. नांदेड

दावा: बॉम्बे रेगुलेशन ॲक्टप्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत...

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मयत यशवंत पि. भगवानराव सोनकांबळे यांची अर्जदार क्र. ०१ ही पत्नी आहे व अर्जदार क्र.०२ व ०३ मुली अर्जदार क्र.०४ हा मुलगा असून गैरअर्जदार ही जन्म दाती आई आहे. मयत यशवंत पि. भगवानराव सोनकांबळे यांचा मृत्यू दि. ०४/१२/२०२५ रोजी झाला आहे. अर्जदाराशिवाय मयतांचे कोणीही वारस नाहीत असे अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे. अर्जदार यांनी मयत यशवंत पि. भगवानराव सोनकांबळे यांचा वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, वरील संबंधिताना मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिलामार्फत ३० दिवसांच्या आत दिनांक २४/०७/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारातर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणावर राहील याची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

क. लिपीक — दि. न्या. क. स्तर, नायगांव

सहायक अधीक्षक — दि. न्या. क. स्तर, नायगांव


## मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर १० मिनिटांत १५ अपघात



**मुंबई(प्रतिनिधी)** –अहमदाबाद महामार्गावर पालघर जिल्ह्यात डहाणूजवळ हे सर्व अपघात झाले आहे. डहाणूजवळ उड्डाणपुलावर एका मोठं भगडाद पडले आहे. मोठा खड्डा या ठिकाणी तयार झाला आहे. हा खड्डा इतका धोकादायक होता की, कॉंक्रीटमध्ये बसवलेल्या लोखंडी सळ्या उघड्या पडल्या होत्या. यामुळे येथून जाणाऱ्या वाहनांचा अपघात झाला. १० ते १२ मिनिटांत अनेक वाहनांचे टायर फुटले, ज्यामुळे बऱ्याच वाहनांचे मोठे नुकसान झाले.

डहाणू तालुक्यात महालक्ष्मी मंदिराजवळील उड्डाणपुलावर हा मोठा खड्डा पडला आहे. रस्त्यावरील एका खोल खड्ड्यात आदळल्याने अनेक वाहनांच्या टायरचे नुकसान झाले. सुदैवाने यापैकी एकाही अपघातात कोणतीही जीवितहानी झालेली नाबी. किंवा कुणाला गंभीर दुखापत झालेली नाही, परंतु वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे.

या अपघातामुळे मुंबई-अहमदाबाद महामार्गाच्या कामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. कोट्यावधी रुपये खर्च करून बांधलेला हा राष्ट्रीय महामार्ग वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. माहील वर्षी या रस्त्याचे डांबरीकरण झाले होते. पहिल्याच पावसात रस्ता खचला आहे. अहवालानुसार, रस्त्याच्या डांबरीकरणावर अंदाजे तब्बल ६२० कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. असे असूनही, कॉंक्रीट ढासळल्याने आणि उघड्या पडलेल्या लोखंडी सळ्यांमुळे बांधकामाच्या दर्जाबद्दल गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. व्हाइट टॉपिंगमध्ये जुन्या आणि खराब झालेल्या डांबरी रस्त्यांवर सिमेंट-कॉंक्रीटचा एक मजबूत थर टाकला जातो. मात्र, असा प्रकारचे कोणतेह काम या महामार्गावर करण्यात आले नव्हते.

## टीईटी पेपरफुटी प्रकरणात आणखी तीन जणांना अटक



**मुंबई(प्रतिनिधी)–**भिवंडी टीईटी पेपरफुटी प्रकरणाच्या तपासात पोलिसांना आणखी एक मोठे यश मिळाले असून या प्रकरणात आणखी तीन जणांना अटक करण्यात आली आहे. नरेशकुमार पुरणचंद माहोर, संजयकुमार सुरेशचंद्र शर्मा आणि बाबूलाल नारायणसिंह कुशवाहा अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. या तिन्ही आरोपींना उत्तर प्रदेशातील आग्रा येथून ताब्यात घेण्यात आले असून त्यांना भिवंडी न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने तिन्ही आरोपींना ९ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या अटकेनंतर टीईटी पेपरफुटी प्रकरणातील अटक आरोपींची संख्या दहावर पोहोचली आहे.

प्राथमिक तपासात महिम पत्रण प्रा. लि. या आग्रा येथील प्रिंटिंग प्रेसमधून प्रश्नपत्रिका बाहेर काढण्याच्या कटात या तिन्ही आरोपींचा थेट सहभाग असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. प्रश्नपत्रिका छपाई प्रक्रियेदरम्यान गोपनीय माहिती बाहेर काढून ती रॅकेटमार्फत संबंधित व्यक्तींपर्यंत पोहोचवण्यात आल्याचा तपास यंत्रणांचा प्राथमिक अंदाज आहे. या संपूर्ण साखळीचा उलगडा करण्यासाठी आरोपींकडे कसून चौकशी सुरू असून अनेक महत्त्वाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागण्याची शक्यता आहे.

या प्रकरणाचे धागेदोरे महाराष्ट्राबाहेर बिहार, हरियाणा, दिल्ली, आग्रा तसेच इतर राज्यांपर्यंत पोहोचल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या धनादेशांची पडताळणी, आर्थिक व्यवहारांची चौकशी, मोबाईल आणि डिजिटल पुराव्यांचे विश्लेषण तसेच या रॅकेटमधील इतर साथीदारांचा शोध घेण्याचे काम वेगाने सुरू आहे. या संघटित रॅकेटमध्ये आणखी काही जणांचा सहभाग असल्याची शक्यता नाकारता येत नसल्याने तपासाची व्याप्ती वाढवण्यात आली आहे.


### जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ११८/२०२६

ललीताबाई व ईतर विरुद्ध निरंक

अर्जदार :- १. ललीताबाई भ्र. बालाजी पांढरे वय ६० वर्षे, २. राहुल पि. बालाजी पांढरे वय ३२ वर्षे, ३. मारोती पि. बालाजी पांढरे वय २८ वर्षे, ४. समता पि. बालाजी पांढरे (समता मनोहर बामणे) वय ३४ वर्षे, अर्जदार क्र. १ ते ३ रा. लोहगांव ता. बिलोली जि. नांदेड अर्जदार क्र. ४ रा. धारणी ता. धरण जि. अमरावती

विरुद्ध-निरंक

विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत बालाजी भगवान पांढरे यांचे अर्जदार क्र. १ ही पत्नी आहे व अर्जदार क्र. २ व ३ हे दोन मुले आहेत व अर्जदार क्र. ४ ही मुलगी आह अर्जदार हे क्र. १ ते ३ रा. लोहगांव ता. बिलोली जि. नांदेड येथील रहीवाशी आहेत. अर्जदार क्र. ४ या, धारणी ता. धरण जि. अमरावती येथील रहिवाशी आहेत मयत बालाजी भगवान पांढरे यांचा मृत्यु दिनांक १८/०५/२०२६ रोजी लोहगांव ता. बिलोली जि. नांदेड येथे झाला आहे. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत बालाजी भगवान पांढरे यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक ०३/०८/२०२६ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा, अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील. आज दि. १२ जुन २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधीक्षक

सह दिवाणी न्यायालय क. स्तर, बिलोली



## लोबल पासपोर्ट इंडेक्समध्ये भारत १२५ व्या क्रमांकावर घसरला

**नवी दिल्ली(प्रतिनिधी)–**लोबल पासपोर्ट इंडेक्स २०२६ मध्ये भारताची घसरण झाली असून देश १२५ व्या क्रमांकावर पोहोचला आहे. गेल्या वर्षी क्रमवारीत थोडी सुधारणा झाली होती, तरीही भारताला पहिल्या १०० देशांमध्ये स्थान मिळू शकले नव्हते. २०२१ ते २०२३ दरम्यान १२७व्या क्रमांकावर असलेला भारत २०२५ मध्ये १२४व्या स्थानावर पोहोचला होता. मात्र, यंदा पुन्हा एकदा घसरण होऊन भारत १२५व्या क्रमांकावर आला आहे.

भारतीय पासपोर्टधारकांना सध्या केवळ २६ देशांमध्ये व्हिसाशिवाय किंवा व्हिसा-ऑन-अरायव्हल सुविधेसह प्रवास करता येतो.भारतीय पासपोर्टची क्रमवारी नामिबियापेक्षाही खाली असून फिलिपिन्स, मोरोक्को आणि उझबेकिस्तानसारख्या देशांपेक्षा भारत मागे आहे. मात्र, अझरबैजान आणि किर्गिस्तानपेक्षा भारताची स्थिती चांगली आहे.भारतीय पासपोर्टधारकांना भूतान, नेपाळ, जमैका, मकाओ, पॅलेस्टाईन, ट्युनिशिया, अंगोला आणि बार्बाडोस यांसारख्या देशांमध्ये व्हिसाशिवाय किंवा व्हिसा-ऑन-अरायव्हलच्या सुविधेसह प्रवेश मिळतो. मात्र, अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स, चीन आणि संयुक्त अरब अमिरातींसह सुमारे ८८ देशांमध्ये प्रवेशासाठी भारतीय नागरिकांना अद्याप व्हिसा घेणे आवश्यक आहे.

भारताच्या शेजारील देशांमध्ये चीन १०४व्या क्रमांकावर असून तो भारतापेक्षा पुढे आहे. मात्र, दक्षिण आशियातील अनेक देशांच्या तुलनेत भारताची स्थिती अधिक चांगली आहे. बांगलादेश १६६व्या, नेपाळ १६४व्या, तर पाकिस्तान १८८व्या क्रमांकावर असून तो या निर्देशांकातील सर्वात खालच्या स्थानांपैकी एका स्थानावर आहे.ग्लोबल पासपोर्ट इंडेक्स २०२६ च्या अव्वल १० देशांच्या यादीत बहुतांश युरोपीय देशांचा समावेश आहे. यावरून जागतिक प्रवास सुलभतेच्या बाबतीत युरोपचे वर्चस्व कायम असल्याचे स्पष्ट होते.

## पुणे विमानतळावर मोठी दुर्घटना टळली! धावपट्टीवर विमानाचे इमर्जन्सी ब्रेक




**पुणे (प्रतिनिधी)–** पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर शुक्रवारी (३ जुलै) मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. पुणे-जयपूर मार्गावरील एअर इंडिया एक्स्प्रेसचे IX-2458 हे विमान उड्डाणासाठी धावपट्टीवर वेगाने धावत असतानाच अचानक एक भटका कुत्रा समोर आल्याची माहिती हवाई वाहतूक नियंत्रण कक्षाने दिली. यानंतर वैमानिकांनी तातडीने रिजेक्टेड टेकऑफ करत विमान सुरक्षितपणे थांबवले.

दुपारी सुमारे ३.१५ वाजता पुण्याहून जयपूरकडे जाणाऱ्या या विमानाचे उड्डाण नियोजित होते. सर्व प्रवासी विमानात बसल्यानंतर विमानाला उड्डाणासाठी परवानगी मिळाली. विमानाने धावपट्टीवर वेग पकडण्यास सुरुवात केली होती. मात्र, त्याचवेळी हवाई वाहतूक नियंत्रण कक्षाने धावपट्टीवर एक कुत्रा धावत असल्याची माहिती वैमानिकांना दिली.

सुरक्षेचा कोणताही धोका पत्करू नये म्हणून वैमानिकांनी तात्काळ रिजेक्टेड टेकऑफ प्रक्रिया राबवत विमानाला अत्यंत सुरक्षितपणे थांबवले. त्यानंतर विमान पुन्हा टर्मिनलकडे नेण्यात आले.

अचानक लावलेल्या इमर्जन्सी ब्रेकमुळे विमानातील अनेक प्रवासी घाबरले. काही काळ नेमके काय घडले, याची माहिती नसल्याने संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर वैमानिकांनी धावपट्टीवर कुत्रा आल्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव उड्डाण थांबवण्यात आल्याची घोषणा केली.


यानंतर धावपट्टीची पुन्हा तपासणी करण्यात आली. सर्व काही सुरक्षित असल्याची खात्री झाल्यानंतर तब्बल एका तासाच्या विलंबाने सायंकाळी ४.२७ वाजता विमानाने जयपूरकडे उड्डाण केले. या सतर्कतेमुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळल्याची चर्चा सुरू आहे.


### टी. सी. हरवली

माझी साक्षी गोविंद कुरुळेकर या नावाची बारावी पासची टी. सी. नांदेड ते कंधार दरम्यान प्रवासात हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी.

**संपर्क पत्ता**–साक्षी गोविंद कुरुळेकर, रा. कुरुळा ता. कंधार जि. नांदेड मो. ९८९०२४८२५४


## महाराष्ट्रात समान नागरी कायदा १०० टक्के लागू होणार –मुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई (प्रतिनिधी) –** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातील मार्गदर्शक तत्वांमध्ये प्रत्येक राज्यावर समान नागरी कायदा आणण्याची जबाबदारी सोपवलेली आहे. जर आपण हा कायदा आणला नाही, तर आपण आपल्या कर्तव्यात कसूर करू. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये समान नागरी कायदा १०० टक्के लागू केला जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. एका खाजगी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते.

या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकार लवकरच एक विशेष समिती स्थापन करणार असून, पावसाळी अधिवेशनात मी त्याची अधिकृत घोषणा करेन, अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली. अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, हा न्यायालयाचा दृष्टिकोन नसून प्रत्येक राज्याला दिलेला स्पष्ट निर्देश आहे. महाराष्ट्रात यासंदर्भातील प्राथमिक प्रक्रिया सुरू करण्यात आली असून समितीचा अहवालही प्राप्त झाला आहे. मात्र, हा अत्यंत संवेदनशील सामाजिक विषय असल्याने, सर्व लोकांना सोबत घेऊन आणि व्यापक सहमतीने हा प्रश्न सोडवावा लागेल, असेही त्यांनी सांगितले.

लोकांच्या मनातील शंका-कुशंका दूर करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित करण्यात आली असून, ही समिती सर्वांचे आक्षेप आणि सूचना ऐकून घेणार आहे. सर्वांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतरच यावर अंतिम निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

ओबीसींचे उपवर्गीकरण राज्यात आधीपासूनच


सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय बंधनकारक असल्याने यातून कोणालाही सूट नाही, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, न्यायालयाने सध्यातरी 'एससी' उपवर्गीकरणाबाबत निर्देश दिले आहेत. ओबीसींच्या अंतर्गत उपवर्गीकरणाबाबत महाराष्ट्रात आधीपासूनच व्यवस्था अस्तित्वात आहे. कर्नाटक आणि तेलंगणा या राज्यांनी आधीच एससी उपवर्गीकरण घोषित केले असून, महाराष्ट्रातही सर्वांना विश्वासात घेऊनच ही प्रक्रिया पूर्ण केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

## भारतीय नौदलाच्या युद्धनौकांच्या सिंगापूर भेटीची यशस्वी सांगता

**नवी दिल्ली(वृत्तसंस्था)–**भारत आणि सिंगापूर यांच्यातील दृढ सामरिक आणि सागरी भागीदारी अधिक मजबूत करत भारतीय नौदलाच्या पूर्व ताफ्यातील रिअर ॲडमिरल आलोक आनंद यांच्या नेतृत्वाखालील आयएनएस उदयगिरी, आयएनएस शक्ती आणि आयएनएस कवरत्ती या युद्धनौकांनी सिंगापूरमधील चांगी नौदल तळावरील आपली बंदर भेट यशस्वीरित्या पूर्ण केली. ही भेट भारतीय नौदलाच्या परिचालनात्मक तैनातीचा भाग होती.

आसियान-भारत सागरी सहकार्य वर्ष आणि भारत सरकारच्या 'क्ट ईस्ट' धोरणाशी सुसंगत असलेल्या या तीन दिवसीय कार्यक्रमात दोन्ही देशांच्या नौदलांमधील समन्वय आणि कार्यसुसंगतता वाढविण्यासाठी विविध व्यावसायिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये परस्पर युद्धनौकांना भेटी देण्याचाही समावेश होता.

## केतन अग्रवाल यांच्या आजोबांचे निधन



**पुणे(प्रतिनिधी)–** केतन अग्रवाल हत्याकांडामुळे आधीच शोकाकुल असलेल्या अग्रवाल कुटुंबावर आणखी एक दुःखाचा डोंगर कोसळला आहे. केतन यांचे आजोबा देविचंद अग्रवाल यांचे पुण्यात उपचारादरम्यान निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावत होती. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

देविचंद अग्रवाल यांनी काही दिवसांपूर्वीच नातू केतनला न्याय मिळावा या मागणीसाठी आयोजित करण्यात आलेल्या कँडल मार्चमध्ये सहभाग घेतला होता. थरथरत्या हातात केतनचा फोटो असलेले बॅनर घेऊन ते या आंदोलनात सहभागी झाले होते. त्यावेळी त्यांनी आरोपींना कठोर शिक्षा व्हावी आणि या प्रकरणातील प्रत्येकाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली होती.

माध्यमांशी बोलताना त्यांनी सिया गोयलच्या कुटुंबीयांवर लग्नासाठी दबाव टाकल्याचा आरोपही केला होता. केतनच्या मृत्यूमुळे कुटुंबाला मोठा धक्का बसला असून आता देविचंद अग्रवाल यांच्या निधना-मुळे कुटुंबावर पुन्हा दुःखाचे सावट पसरले आहे. देविचंद अग्रवाल यांच्यावर शनिवारी पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

देविचंद अग्रवाल हे तुळजापूर-मधील ज्येष्ठ उद्योजक म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या निधनामुळे तुळजापूरमधील व्यापारी क्षेत्रातही हळहळ व्यक्त केली जात आहे. अनेक सामाजिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील व्यक्तींनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.


### टी.सी. हरवली

माझी शेख अबू झैद शेख इस्माईल या नावाची बारावी पास सना हायस्कूलची टी. सी. चैतन्यनगर ते रेल्वे स्टेशन प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी. योग्य ते बक्षीस दिले जाईल. **संपर्क पत्ता**–निलोफर कॉलनी, चैतन्य नगर, तरोडा (बु.), नांदेड.

मो. ९०६९७०७९७९

### टी.सी. हरवली

माझी नितीन शंकरराव गिरी या नावाची दहावी पासची टी. सी. सिडको ते रेल्वेस्टेशन दरम्यान ऑटोने प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा ही विनंती. आणून देणारास योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

**मोबाईल नंबर**
**९८८१३६१५६५**

### कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



### पोलीस ठाण्यालगतच चोरट्यांचा धुमाकूळ

# एका रात्रीत ५ दुकाने फोडून लाखोंचा ऐवज लंपास

## ★ नायगावच्या सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह ★ व्यापाऱ्यांचा संताप

**नायगाव (प्रतिनिधी)** – नायगाव शहरात चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घालत पोलीस प्रशासनालाच उघड आव्हान दिल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. विशेष म्हणजे पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या मुख्य बाजारपेठेतील तब्बल पाच दुकाने शनिवार-रविवारच्या मध्यरात्री फोडून चोरट्यांनी लाखो रुपयांच्या ऐवजावर डल्ला मारला. या धाडसी चोरीमुळे व्यापारी वर्गात तीव्र संतापाची लाट उसळली असून, शहरातील कायदासुव्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार मध्यरात्रीनंतर अज्ञात चोरट्यांनी गजबजलेल्या बाजारपेठेला लक्ष्य करत एकामागोमाग एक दुकानांचे शटर उघडले. दुकानांमध्ये प्रवेश करून रोकड, मौल्यवान साहित्य तसेच विक्रीसाठी ठेवलेल्या वस्तू पळविण्यात आल्या. पहाटे दुकानदार दुकाने उघडण्यासाठी आले असता तुटलेले शटर, अस्ताव्यस्त पडलेले साहित्य आणि चोरीचे दृश्य पाहून परिसरात एकच खळबळ उडाली.

या घटनेतील सर्वात गंभीर बाब म्हणजे चोरी झालेला संपूर्ण परिसर पोलीस ठाण्यालगतचा आहे. त्यामुळे चोरट्यांनी थेट पोलीस यंत्रणेलाच आव्हान दिल्याची चर्चा शहरभर सुरू झाली आहे.



गेल्या काही दिवसांपासून नायगाव शहरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असताना त्यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात पोलीस प्रशासन अपयशी ठरत असल्याची भावना व्यापाऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. भरवस्तीतील आणि मध्यवर्ती बाजारपेठेत घडलेल्या या प्रकारामुळे व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती समोर येत आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी, संशयितांच्या हालचालींचा मागोवा आणि तांत्रिक पुरावे गोळा करण्याचे काम सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. मात्र, चोरी झाल्यानंतर तपासाची औपचारिकता करण्यापेक्षा अशा घटना रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि प्रभावी रात्रीची गस्त का नव्हती, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, व्यापारी संघटनांनी या घटनेचा तीव्र निषेध नोंदवत चोरट्यांना तातडीने अटक करावी, शहरात रात्रीची गस्त वाढवावी, बाजारपेठेत कायमस्वरूपी पोलीस बंदोबस्त तैनात करावा आणि व्यापाऱ्यांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

# भाग्यनगर पोलिसांची तत्परता; ८० हजारांचा घोडा मालकाला परत, २ चोरट्यांना अटक



**नांदेड (प्रतिनिधी)**– पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने चोरीस गेलेला ८० हजार रुपये किमतीचा मारवाडी जातीचा घोडा अवघ्या दोन दिवसांत शोधून काढला. तसेच या प्रकरणी दोन आरोपींना ताब्यात घेऊन चोरीस गेलेला घोडा मूळ मालकाच्या ताब्यात दिला आहे.

डॉ. राघवेंद्र शिवाजीराव कुलकर्णी, वय ३९ वर्षे, रा. रविनगर, नांदेड यांनी १९ जूनच्या रात्री जिरायत मैदान परिसरातून आपला मारवाडी घोडा चोरीला गेल्याची तक्रार दिली होती. त्यानुसार भाग्यनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३४२/२०२६, भा.न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) नुसार गुन्हा नोंद करण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास सुरू असताना गुन्हे शोध पथकातील पोउपनि. नरेश वाडेवाले यांना मिळालेल्या गोपनीय माहिती, तांत्रिक विश्लेषण आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध घेण्यात आला. पोलिसांनी शेख अदिन शेख यासीन, वय २० वर्षे, रा. लेबर कॉलनी, नांदेड आणि एक विधिसंघर्षग्रस्त बालक यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून चोरीस गेलेला मारवाडी घोडा हस्तगत करून तो मूळ मालक डॉ. कुलकर्णी यांना परत करण्यात आला.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष तांबे, पोलीस निरीक्षक महेश माळी यांच्या नेतृत्वात गुन्हे शोध पथकाचे पोउपनि. नरेश वाडेवाले, पोउपनि. विनोद देशमुख, हवालदार विशाल माळवे, अंमलदार अदनान पठाण, विष्णुकांत मुंडे, राजीव घुले, राहुल लाठकर, नागनाथ चापके, सुधाकर मरदोडे, अंकुश कांबळे यांनी पार पाडली.

### स्वागत समारंभ

#### पिंपरखेडे – मराठे

नांदेड येथील अ‍ॅड. गजानन पिंपरखेडे यांचे सुपुत्र चि. वेदांत व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथील रहिवासी संजय मराठे यांची सुकन्या चि. सौ. कां. रेणुका यांच्या विवाहानिमित्त स्वागत समारंभ सोमवार, दि. ६ जुलै रोजी सायंकाळी ६ ते १० वाजेपर्यंत जुना कौठा येथील सप्तगिरी बँकेट हॉल येथे आयोजित केला आहे.

#### सुंकरवार – आळणेवार

नांदेड येथील विश्वनाथ सुंकरवार यांचे सुपुत्र चि. विनीत व चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही येथील रहिवासी संजय आळणेवार यांची सुकन्या चि. सौ. कां. मोनिका यांच्या विवाहानिमित्त स्वागत समारंभ सोमवार, दि. ६ जुलै रोजी सायंकाळी ६ ते १० वाजेपर्यंत नमस्कार चौकातील हॉटेल सिटीसिंफणी येथे आयोजित केला आहे. वधू-वरांना हार्दिक शुभेच्छा!

–मुख्यसंपादक

# वृत्तपत्र विक्रेत्यांच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध – आ. अमर राजूरकर

**नांदेड (प्रतिनिधी)** –'वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळ' तातडीने कार्यान्वित करावे, या मुख्य मागणीसाठी नांदेड जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाच्या शिष्टमंडळाने नवनियुक्त आमदार अमर राजूरकर यांची रविवारी सकाळी त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी राज्य वृत्तपत्र विक्रेता कार्याध्यक्ष बालाजी पवार यांच्या नेतृत्वाखाली आ. राजूरकर यांचा सत्कार करण्यात आला.

आ. अमर राजूरकर हे सलग तिसऱ्यांदा विधानपरिषदेत आमदार म्हणून निवडून आल्याबद्दल यावेळी शिष्टमंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आ. अमर राजूरकर यांनी विशेष लक्ष घालून तत्कालीन महापौर सौ. मोहिनी विजय येवनकर यांनी नांदेडमध्ये वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी 'सेंटर शेड'ची महत्त्वाची मागणी पूर्ण केली. आता राज्यातील लाखो वृत्तपत्र विक्रेत्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा



असणारा 'कल्याणकारी महामंडळ कार्यान्वित करण्याचा' प्रश्न आगामी विधानपरिषद अधिवेशनात उपस्थित करून सरकारकडे आग्रही मागणी करावी, अशी मागणी बालाजी पवार यांनी केली.

याप्रसंगी भाजपाचे पदाधिकारी विजय येवनकर, माजी नगरसेवक संदीप सोनकांबळे, जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत घाटोळ यांची प्रमुख उपस्थिती होती. शिष्टमंडळाची मागणी आणि भावना जाणून घेतल्यानंतर आमदार अमर राजूरकर म्हणाले की, हा प्रश्न माझ्या पूर्णपणे माहितीचा असून, वृत्तपत्र विक्रेत्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी मी नेहमीच तत्पर आहे. वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळाच्या अंमलबजावणीसाठी आणि विक्रेत्यांच्या इतर सर्व न्याय्य हक्कांसाठी मी शासनाकडे निश्चितपणे पाठपुरावा करीन, अशी ग्वाही दिली.

यावेळी नांदेड जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत घाटोळ, सचिव गणेश वडगावकर, कोषाध्यक्ष बाबू जल्देवार, सदस्य सत्यनारायण देवरकोंडा, अनिल मेडेवार, संजय गोणे, गणेश राऊतराव, विजय कठारे, साईनाथ पस्सलवाड, शंकर जोशी, गंगाधर सदावर्ते आणि साईनाथ हंगरगे यांच्यासह जिल्ह्यातील वृत्तपत्र विक्रेते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### इकडचं तिकडचं

## पळवाटा काढणारे लई हुश्शार

खवय्या ग्राहकांना आता बाटलीबंद पाण्यासाठी पैसे मोजणे हे ऐच्छिक असेल, कारण अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी निर्देश दिले आहेत की, हॉटेलमध्ये शुध्द पिण्याचे पाणी मोफत मिळणार. त्यासोबतच विनाअनुदानित खाजगी शाळांना सर्व प्रकारच्या शुल्काचा बोर्ड दर्शनी भागात लावावा लागणार असल्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले आहेत. या दोन बातम्या सध्या सर्वत्र चर्चेचा विषय बनल्या आहेत. दोन्ही बातम्या जनसामान्यांना दिलासा देणाऱ्या तसेच 'डे टू डे लाईफ'शी निगडित आहेत. त्यामुळे यावर उलटसुलट चर्चा तर होणारच ना?

काही मध्यमवर्गीयांना वाटतंय की, या दोन्ही नियमांचे तंतोतंत पालन होऊन आपल्या खिशाला बसणारी अनावश्यक चाट थोड्याफार प्रमाणात का होईना पण वाचेल.

परवा अशीच चर्चा करणाऱ्या एका घोळक्याने कुतुहलापोटी बाजारात भाजी विकत बसलेल्याला यावर उगाच छेडलं. त्यावर ते भाजी विक्रेते म्हणाले, आवो सायेब, कायदे समदेच चांगले हाईत, पण राबवणारे कुठं इमानदार ऱ्हायल्यात आता? पोलिसांपेक्षा चोर काय लई हुश्शार असतेत व्हय, तरीबी हर बाजारात पाच-पंचवीस मोबाईल आन एक-दोन मंगळसूत्र चोरीला जात्यातच की.! पोलिसांना समदी चोरं ठाऊक असत्यात असं सगळेच बोलत्यात. तसंच हे शाळावालंबी, कायबी करुन त्यांना काढायचा तेवढा पैसा आपल्या खिशातून काढणारच. अधिकाऱ्यास्नी बी हे समदं ठावं असतंच की. आंधळं दळतं आन कुत्रं पीठ खातं अशीच लोकशाहीत सरकारची अवस्था हाय बगा!

फार शिक्षित नसलेल्या नागरिकांनीही यंत्रणेचे एवढे चटके सोसून इतकं सुक्ष्म निरीक्षण केले असावे की, इथली बरबटलेली व्यवस्था चांगल्या नियमांचा शंभर टक्के बोजवारा उडविणार याची पक्की खात्री त्या बिचाऱ्यांना आहे.

देशातील लोकशाहीच्या दुरावस्थेला दुर्जनांच्या सक्रियतेपेक्षा सज्जनांची निष्क्रियता अधिक घातक ठरते आहे का? आभाळंच फाटलंय, तुकाराम मुंढेंसारख्या एखाददुसऱ्या अधिकाऱ्याचे ठिगळ त्यावर पुरेसे होईल का? हा प्रश्न स्वतःच्याच मनाला विचारत मी तिथून काढता पाय घेतला...

– शिवाजीराजे पाटील बाभळीकर –

# नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज धरणे आंदोलन..!

**नांदेड (प्रतिनिधी)** – देशातील वैद्यकीय व इतर स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटी घटनांच्या निषेधार्थ आणि शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता व विश्वासार्हता प्रस्थापित करण्याच्या मागणीसाठी विद्यार्थी व संविधान बचाव कृती समिती नांदेडच्या वतीने सोमवार, दि. ६ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहेत.

समितीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, देशातील लाखो विद्यार्थी नीट, टीईटी आणि सीबीएसईसारख्या परीक्षांच्या माध्यमातून आपले भविष्य घडविण्याचे स्वप्न पाहत असताना अशा परीक्षांमध्ये कथित पेपरफुटीच्या घटना समोर येत आहेत. त्यामुळे विद्यार्थी, पालक आणि समाजामध्ये परीक्षांच्या पारदर्शकतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले असून, गुणवत्तेपेक्षा पैशाच्या बळावर प्रवेश मिळण्याची भीती व्यक्त होत आहे.

दिल्लीतील जंतर-मंतर येथे अभिजित दीपके यांच्या नेतृत्वाखाली कॉक्रोच जनता पार्टीच्या वतीने सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा म्हणून नांदेड येथे हे धरणे आंदोलन आयोजित करण्यात आल्याचे समितीने स्पष्ट केले आहे.

या आंदोलनाद्वारे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, नीट पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, टीईटी पेपरफुटी प्रकरणी महाराष्ट्राचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी राजीनामा द्यावा तसेच देशातील शिक्षण व्यवस्था अधिक पारदर्शक, विश्वासार्ह व विद्यार्थी केंद्रित करण्यासाठी आवश्यक सुधारणा तातडीने राबवाव्यात, अशा प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत, असे विद्यार्थी व संविधान बचाव कृती समितीच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# नांदेड–एलटीटीटी मुंबई नवीन एक्सप्रेसच्या शुभारंभानिमित्त विशेष अनारक्षित रेल्वेगाडी

**नांदेड (प्रतिनिधी)** – रेल्वे मंत्रालयाने गाडी क्रमांक १७६६५/१७६६६ आणि १७६६७/१७६६८ हजूर साहिब नांदेड – लोकमान्य टिळक टर्मिनस (मुंबई)–हजूर साहिब नांदेड द्वि-साप्ताहिक एक्सप्रेस सुरू करण्यास मंजुरी दिली आहे. या नवीन सेवेच्या शुभारंभानिमित्त गाडी क्रमांक ०७६६७ हजूर साहिब नांदेड–लोकमान्य टिळक टर्मिनस (मुंबई) एकमार्गी उद्घाटन विशेष अनारक्षित गाडी चालविण्यात येणार आहे.

ही विशेष गाडी सोमवार, दि. ६ जुलै २०२६ रोजी हजूर साहिब



नांदेड येथून सकाळी १०.४५ वाजता सुटून मंगळवार, दि. ७ जुलै २०२६ रोजी पहाटे ४.५० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस (मुंबई) येथे पोहोचेल.

ही विशेष गाडी पूर्णा, बसमत, हिंगोली डेक्कन, वाशीम, अकोला, मलकापूर, भुसावळ, चाळीसगाव, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी, कल्याण मार्गे लोकमान्य टिळक टर्मिनस (मुंबई) येथे जाईल. या विशेष गाडीत एकूण १८ अत्याधुनिक एलएचबी डबे असतील. ही गाडी अनारक्षित स्वरूपात चालविण्यात येणार आहे. दक्षिण मध्य रेल्वेने प्रवाशांना या रेल्वे सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन केले असून, प्रवासापूर्वी गाडीच्या वेळापत्रकाची माहिती रेल्वे चौकशी सेवा १३९, NTES किंवा जवळच्या रेल्वे स्थानकावरून मिळवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जुना कौठा येथील भाविक अमरनाथ यात्रेसाठी रवाना



**नांदेड (प्रतिनिधी)** –जुना कौठा नांदेड येथील भाविकभक्त मोठ्या संख्येने रविवारी हरहर महादेवच्या घोषणा देत अमरनाथ यात्रेसाठी रवाना झाले आहेत. यामध्ये दत्ता काकडे, शिवराम गोरे, ईश्वर काकडे, नारायण गोरे, तुकाराम काकडे, श्रीनिवास मात्रे, सुरेश वीर हे भाविकभक्त सहभागी झाले आहेत. जुना कौठा येथे आणि रेल्वेस्टेशनवर त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मित्र मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढील प्रवास सुखरूप व आनंदाचा जावो, अशा शुभेच्छा मित्र मंडळींनी दिल्या.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते भारत काकडे, भागवत बारसे, वैभव काकडे, रवी गुरु, धनंजय काकडे, बलदीप ठाकूर, दीपक काकडे, रविंद्र काळे, राम काकडे, गोविंदा मात्रे, विठ्ठल महाराज वैद्य, बळीराम काकडे, एकनाथ हाके, ज्ञानेश्वर काकडे, इंद्रजीत पिसाळ, आदित्य काकडे व गावकरी मंडळी आदींची उपस्थिती होती.

# विजय सिकची यांना मातृशोक

**नांदेड (प्रतिनिधी)** – शारदानगर परिसरातील सेवानिवृत्त न्यायाधीश विजय सिकची यांच्या मातोश्री पद्माबाई राधावल्लभ सिकची यांचे दि. ३० जून रोजी दुपारी २ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८८ वर्षे होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



श्रीमती पद्माबाई सिकची यांच्या पार्थिवावर बुधवार, दि. १ जुलै रोजी सकाळी शांतिधाम गोवर्धन घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व स्तरातून मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

# जीवघेणा हल्ला करणाऱ्या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– जुन्या भांडणाच्या कारणावरून एका तरुणावर शिवीगाळ करत जीवघेणा हल्ला केल्याची घटना ३ जून रोजी रात्री ८ वाजता उस्माननगर – नांदेड रोडवरील सिडको स्थित पेट्रोलपंपासमोर घडली. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील आरोपी ताब्यात असून अटकेची प्रक्रिया सुरू आहे.

आरोपी निखिल गजमारे व त्याच्या अन्य ३ साथीदारांनी संगनमत करून जुन्या भांडणाचा राग मनात धरून भीमवाडी येथील प्रतिभा नारायण जोंधळे यांचा मुलगा परमेश्वर उर्फ बबलु नारायण जोंधळे यास शिवीगाळ केली. त्यानंतर त्याला जीवे मारण्याच्या उद्देशाने पोट व छातीवर खंजरने मारहाण करून गंभीर जखमी करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी प्रतिभा नारायण जोंधळे यांच्या तक्रारीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक चव्हाण करीत आहेत.

# माजी नगरसेवक फिरोज खान यांचा भाजपमध्ये प्रवेश

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड मनपाच्या प्रभाग क्रमांक ८ मधील माजी नगरसेवक फिरोज खान (फिरोजभाई) यांनी आपल्या समर्थकांसह खा. तथा माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते, माजी राज्यमंत्री डी. पी. सावंत, आ. अमरनाथ राजूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

याप्रसंगी भाजपा महानगर सरचिटणीस विजय येवनकर, नगरसेवक संदीप सोनकांबळे, मंडळ अध्यक्ष अमीत वाघ आदींची उपस्थिती होती. फिरोजभाई यांनी काँग्रेस, एमआयएम आणि अपक्ष उमेदवार म्हणून जनतेचा कौल मिळवत त्यांनी तीन वेळा नगरसेवकपद भूषविले आहे. प्रभाग क्रमांक ८ मध्ये त्यांचा मजबूत जनाधार, सर्वधर्मीय समाजातील प्रभावी संपर्क आणि कार्यकर्त्यांचे विस्तृत जाळे लक्षात घेता त्यांचा भाजप प्रवेश हा आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाचा राजकीय घटनाक्रम मानला जात आहे.

आ. अमरनाथ राजूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली नईआबादी, लेबर कॉलनी, लालवाडी, तेहरा नगर, श्रावस्ती नगर, आंबेडकर नगर आणि गोकुळ नगर परिसरातील शेकडो कार्यकर्त्यांनी फिरोजभाई यांच्या



नेतृत्वाखाली भाजपमध्ये प्रवेश केला. या प्रवेशामुळे संबंधित भागात भाजपची संघटनात्मक ताकद वाढणार असून, विरोधी पक्षांसमोर मोठे आव्हान उभे राहिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

या पक्षप्रवेश सोहळ्यास माजी मंत्री डी. पी. सावंत, महापौर प्रतिनिधी संतोष मुळे, माजी महापौर प्रतिनिधी विजय येवनकर, नगरसेवक उमेश चव्हाण, सलाम चावलवाला, अमित तेहरा, माजी नगरसेवक संदीप सोनकांबळे, अमित वाघ यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पक्षप्रवेश करणाऱ्यांमध्ये हाफिज खान, शम्मू काजी, शेख रियाज, शेख खाजा (पोलीस मित्र), मिर्झा आजम बेग, हमीद खान, शेख अन्वर, हकीम भाई, रऊफ भाई, नदीम भाई, बबलू मोहम्मद टेलर, मोहसीन भाई, जलाल टेलर, मोईनुद्दीन काजी, अझर भाई, शोएब खान, शेख आजम खान, नुसरत खान, अशफाक खान, खलीलभाई, खदीर भाई, रज्जाक भाई, पाशा मामू, कलाम भाई, आदिल खान, सोहेल खान, मझर भाई, अहमद, रियाज (बेकरीवाले), सुलतान भाई, उमेर भाई, युसूफ भाई, नजीब भाई, मुदस्सीर भाई यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांचा समावेश होता.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com